307

COURSE CODE : EDU 510
BOOK CODE : 5101

ज्ञानगंगा घरोघरी

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

एम.ए. (शिक्षणशास्त्र) M83
सत्र पहिले

शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन

Scanned with CamScanner

M 83

यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त
विद्यापीठ

ज्ञानगंगा घरोघरी

एम.ए. (शिक्षणशास्त्र)

EDU510 : शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन

लेखक : डॉ. प्रतिभा देसाई, प्रा. विजया पाटील डॉ. पुष्पा पाटील, डॉ. लता बामणे, डॉ. महेश कोलतामे, डॉ. संजय शिंदे

घटक १	:	शैक्षणिक मार्गदर्शन	०१
घटक २	:	शैक्षणिक मार्गदर्शनाचे प्रकार, साधने व तंत्र	२३
घटक ३	:	शैक्षणिक समुपदेशन	५४
घटक ४	:	शैक्षणिक समुपदेशन प्रक्रिया, तंत्रे व साधने	८१
घटक ५	:	विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन व समुपदेशन	१०९

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

विद्याशाखा परिषद

प्रा. कविता साळुंके
प्र. संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
अमरावती ४४४६०२

डॉ. सुलभा दिलीपराव देशमुख,
प्राचार्य, श्रीमती सुशिलादेवी
साळूंके कॉलेज ऑफ एज्युकेशन
आर.पी. कॉलेज कँम्पस,
उस्मानाबाद ४१३५०१

प्रा. मंजुलिका श्रीवास्तव
इंदिरा गांधी नॅशनल ओपन
युनिव्हरसिटी, मैदान गढी
विद्याशाखा
न्यू दिल्ली

प्रा. माधुरी सोनवणे
प्राध्यापक,
कृषी विज्ञान विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

प्रा. विजया पाटील
प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक

श्री. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. राधिका इनामदार-
प्राचार्य, १६६३ / २ सदाशिव पेठ,
एस.पी.कॉलेज कँम्पस,
पुणे ४११ ०३

डॉ. अशोक राणे, प्राचार्य,
खांदेश एज्युकेशन सोसा.चे
कॉलेज ऑफ एज्युकेशन,
एम. जे. कॉलेज परिसर,
जळगांव ४२५ ००१

प्रा. सज्जन थुल
प्राध्यापक,
मूल्यमापन विभाग
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. सुनंदा मोरे
प्र. संचालक
विज्ञान आणि तंत्रज्ञान विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ ,नाशिक

डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. गजानन गुल्हाणे
प्रमुख, शिक्षणशास्त्र
विद्याशाखा संत गाडगे बाबा
अमरावती, विद्यापीठ

डॉ. मीना कुटे
प्राचार्य एस.एस.आर.कॉलेज
ऑफ एज्युकेशन सायली,
सिलवासा डी.एन.एच.

डॉ. अभय पाटील
सहायक प्राध्यापक
आरोग्य विज्ञान
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

प्रा. संजीवनी महाले
प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ , नाशिक

डॉ. दयाराम पवार
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

तज्ज्ञ सल्लागार समिती

डॉ. अनंत जोशी
माजी संचालक, शिक्षणशास्त्र
विद्याशाखा य.च.म.मु.
विद्यापीठ, नाशिक

डॉ. सुनीता मगरे
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी
प्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग
परिसर, सांताक्रुझ (पूर्व)
कलिना मुंबई

प्रा. कविता साळुंके
प्र. संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ ,नाशिक

डॉ. मेघा उपलाने
प्रमुख शिक्षणशास्त्र व विस्तार
विभाग सावित्रीबाई फुले पुणे
विद्यापीठ आंबेडकर भवन,
पुणे ४११००७

डॉ.ह.ना जगताप
निवृत्त प्राचार्य, डी.पी.बी दयानंद
कॉलेज ऑफ एज्युकेशन
सोलापूर ४१३००४

डॉ. गजानन गुल्हाने
प्रमुख, शिक्षणशास्त्र विद्याशाखा
संत गाडगे बाबा अमरावती
विद्यापीठ अमरावती. ४४४६०२

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

डॉ. अशोक राणे
प्राचार्य. के. सी.ई. सो. शिक्षणशास्त्र
आणि शारीरिक शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, जळगाव ४२५००२
डॉ. चंद्रकांत बावीस्कर
सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ नांदेड ४३१६०६
प्रा. संजीवनी महाले
प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. प्रतिभा पाटणकर
प्राध्यापक व विभागप्रमुख
शिक्षणशास्त्र अधिविभाग,
विद्यापीठ कोल्हापूर ४१६००४
डॉ. संजीवनी मुळे
प्राचार्य, शासकीय अध्यापक
शिवाजी महाविद्यालय (IASE)
औरंगाबाद

डॉ. मीना कुटे
प्राचार्य एस.एस.आर.कॉलेज
ऑफ एज्युकेशन सायली,
सिलवासा डी. एन. एच.
प्रा. विजया पाटील
प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक

पाठ्यक्रम विकसन समिती

प्रा. कविता साळुंके
प्र. संचालक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
प्रा. विजया पाटील
प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक
श्री. विजयकुमार पाईकराव
सहयोगी प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. पुष्पा पाटील
सहाय्यक प्राध्यापक
श्री. सुही नाईक
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर
डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक
डॉ. दयाराम पवार
सहायक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र, विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

डॉ. प्रतिभा पाटणकर
प्राध्यापक आणि विभागप्रमुख
शिक्षणक्रम विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
प्रा. संजीवनी महाले
प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक

लेखक

घटक १
डॉ. प्रतिभा देसाई
सहायक प्राध्यापक
आचार्य जावडेकर शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, गारगोटी

घटक २
डॉ. पुष्पा पाटील
सहाय्यक प्राध्यापक
श्री. सुही नाईक
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवापूर

घटक ३
डॉ. लता विष्णू बामणे
प्राध्यापक, दयानंद शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, सोलापूर

घटक ४
डॉ. महेश कोलतामे
सहायक प्राध्यापक
पी.व्ही.डी.टी. महिला शिक्षण
महाविद्यालय, SNDT महिला
विद्यापीठ, मुंबई-20

घटक ५
डॉ. संजय शिंदे
प्राचार्य, जिजामाता एज्युकेशन
सोसायटीचे ऑफ एज्युकेशन
नंदुरबार-425412

प्रा. विजया पाटील
प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक

309

आशय संपादन	अनुदेशन संपादन	संयोजक व समन्वयक
डॉ. ह. ना जगताप निवृत्त प्राचार्य, डी.पी.बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन सोलापूर 413004	प्रा. विजया पाटील प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक	प्रा. विजया पाटील प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा य.च.म.मु. विद्यापीठ नाशिक

निर्मिती

श्री. विलास बधान
प्रमुख (प्र.), ग्रंथनिर्मिती केंद्र

© २०२३, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- **प्रथम मुद्रण :** जुलै २०२३ • **प्रकाशन क्र. :** २७७३
- **अक्षरजुळणी :** आर. एस. एन्टरप्रायजेस, नाशिक ४२२१०१
- **मुद्रक :** श्रीमती. जे. आर. पाटील, श्रीपाद ऑफसेट, ४६४, ई, वॉर्ड शाहूपुरी, व्हीनस कॉर्नर, कोल्हापूर ४१६००१
- **प्रकाशक :** श्री. भटूप्रसाद पाटील, कुलसिचव (प्र.), यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक ४२२ २२२

ISBN 978-81-19791-01-9

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

घटक १ : शैक्षणिक मार्गदर्शन

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय-विवेचन

- १.२.१ शैक्षणिक मार्गदर्शन : संकल्पना अर्थ, व्याप्ती, गरज, महत्त्व, फायदे
- १.२.२ शैक्षणिक मार्गदर्शनाची ध्येये व उद्दिष्टे
- १.२.३ शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्त्वे
- १.२.४ शैक्षणिक मार्गदर्शनांची विविध मार्गदर्शन सेवा व आवश्यक मनुष्यबळ, शालेय मार्गदर्शन समिती
- १.२.५ शैक्षणिक मार्गदर्शन - एक व्यवसाय

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हांला....

- 'मार्गदर्शन व शैक्षणिक मार्गदर्शन' या संकल्पनांचा अर्थ स्पष्ट करता येईल.
- मार्गदर्शन व शैक्षणिक मार्गदर्शन यांची व्याप्ती, गरज महत्त्व व फायदे सांगता येतील.
- शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्त्वे स्पष्ट करता येतील.
- शैक्षणिक मार्गदर्शनाच्या विविध मार्गदर्शन सेवा व आवश्यक मनुष्यबळ, शालेय मार्गदर्शन समिती याबाबतची माहिती सांगता येईल.
- शैक्षणिक मार्गदर्शन : एक व्यवसाय याविषयी चिकित्सा करता येईल.

१.१ प्रास्ताविक

१९६४-६६ च्या कोठारी कमिशनने मार्गदर्शन व समुपदेशनाच्या कार्यक्रमांची शिफारस केलेली आहे. त्यांच्या मते, मार्गदर्शन व समुपदेशनाची ध्येये ही समायोजनात्मक आणि वैकासिक असावीत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने मार्गदर्शन व समुपदेशन केले पाहिजे. म्हणून मार्गदर्शन व समुपदेशन हे शिक्षणातील अविभाज्य अंग

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

आहे. आणि त्याची गरज सर्वच विद्यार्थ्यांना आहे. ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे ज्यामध्ये विद्यार्थ्यांना वेळोवेळी समायोजनासाठी व निर्णय घेण्यासाठी सहाय्य करावे लागते.

मार्गदर्शन प्राथमिक विद्यार्थ्यांमध्ये स्तरापासून सुरू व्हावे, बालक घरून शाळेत येत असताना सामाजिक समायोजनासाठी मार्गदर्शन करावे. त्यांच्या अध्ययनातील मूलभूत शैक्षणिक कौशल्य संपादणुकीतील अचडणींचे निदान करावे. त्यांचे कुशाग्र, मागास, शारीरिक अपंग अशा प्रकारचे निदान करून त्यांच्या गरजा ओळखाव्यात, गळतीची कारणे शोधावीत, कामाबाबत, श्रमाबाबत सकारात्मक दृष्टीकोण निर्माण करावा.

माध्यमिक स्तरावर बऱ्याचशा आवडी-निवडी आणि क्षमता ओळखता येण्याइतक्या स्थिर आणि सामाईक असतात. त्यामुळे अशा आवडींची व क्षमतांची ओळख त्यांना करून देऊन त्यांच्या विकासास हातभार लावता येतो. त्यामुळे त्यांना आपल्यातले गुण, उणिवा यांची जाणीव होते. याच वयात या गुण व उणिवांच्या संदर्भात उपयुक्त शैक्षणिक संधी व व्यवसायिक संधींची माहिती त्यांच्या विकासास पूरक ठरते. तसेच आपले गुण व उणिवा लक्षात घेऊन घरी, शाळेत आणि समाजात समायोजन कसे करावे, आपल्या समस्या कशा सोडवाव्यात याबाबत विचार करता येतो.

मार्गदर्शनाचा उपयोग शिक्षक, मुख्याध्यापकांनाही होतो. प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमता कळल्यामुळे त्यांच्या परिणामकारक अध्ययनासाठी काय करावे याचा विचार करून तशी कार्यवाही करता येते. माध्यमिक शिक्षण आयोगाच्या शिफारशींवरून शैक्षणिक खात्याने शिक्षण आणि व्यवसाय मार्गदर्शन मंडळ स्थापन केले. त्यामुळे आता मार्गदर्शन ही केंद्रीय पुरस्कृत योजना बनली आहे. या मंडळांमधून प्रशिक्षित समुपदेशक शालेय विद्यार्थ्यांना आधुनिक व शास्त्रीय पध्दतीने मार्गदर्शन करतात. तरीही त्याची प्रगती मंद आहे. पुरेसे मार्गदर्शन सर्व माध्यमिक शाळांना पोहचत नाही. यासाठी शैक्षणिक मार्गदर्शन करणे काळाची गरज आहे.

१.२ विषय-विवेचन

१.२.१ शैक्षणिक मार्गदर्शन : संकल्पना अर्थ, व्याप्ती, गरज, महत्त्व, फायदे

शैक्षणिक मार्गदर्शन समजून घेण्याआधी आपण मार्गदर्शन ह्या संकल्पनेची ओळख करून घेऊ या. भौतिक विकासाबरोबर मानवी जीवन व मानवी समाज हा अधिक गुंतागुंतीचा होत चालला आहे. अशा वेळी केवळ स्वत:च्या मर्यादित अनुभवांच्या आधाराने मार्गदर्शन करणे धोक्याचे झालेले आहे. कोणत्याही क्षेत्रात मार्गदर्शन करण्यासाठी प्रशिक्षित तज्ज्ञ व्यक्तीची गरज भासू लागली आहे. मार्गदर्शन ही स्वतंत्र ज्ञानशाखेच्या स्वरूपात विकसित होऊ पहात आहे. मार्गदर्शन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने प्रशिक्षण घेणे आवश्यक झाले आहे. म्हणूनच शैक्षणिक क्षेत्रातील मार्गदर्शनाचे काम करू पाहणाऱ्या शिक्षकांच्या प्रशिक्षणात या विषयाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.मार्गदर्शन या संकल्पनेच्या अनेक तज्ज्ञांनी व्याख्या केलेल्या आहेत त्या आपण अभ्यासू या.

- गुड (Good : व्यक्तीची अभिवृत्ती व त्यानुसार होणारे वर्तन यावर प्रभाव पाडणारी गतिमान परस्परसंबंधाची प्रक्रिया म्हणजे मार्गदर्शन होय'
- ब्रेवर जे. एम.(Brevar J. M) : 'व्यक्तीस स्वत:चे मार्गदर्शन स्वत:च करण्यासाठी समर्थ करणारी प्रक्रिया म्हणजे मार्गदर्शन होय'
- मार्गदर्शन म्हणजे व्यक्तींमधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्यानुसार शिक्षण वा प्रशिक्षणाने स्वत:ची उन्नती व समाजहित साधण्याची प्रक्रिया - संयुक्त संस्थान (शिक्षणविभाग) (अमेरिका.
- मार्गदर्शन म्हणजे व्यक्तीला जीवनात समायोजन करण्यासाठी मदत करण्याची प्रक्रिया - न्यूयॉर्क स्टेट रीसर्च असोसिएशन (१९३५) सरवदे शशी (२००८) पृ.१

"मार्गदर्शन हा शैक्षणिक कार्यक्रमाचा एक भाग आहे, जो विशेषकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या व्यक्तीगत परिस्थितीशी समायोजन साधण्यासाठी आणि त्याची अभिरूचीक्षमता आणि सामाजिक गरजा लक्षात घेऊन त्याच्या भविष्यकाळाचे नियोजन करण्यासाठी त्याला सहाय्य करते" **हॅमरिन व इरीकसन**

वरील सर्व व्याख्यांवरून असे स्पष्ट होते की, मार्गदर्शन ही एक सतत चालणारी प्रक्रिया असून तिचा उद्देश व्यक्तीस स्वत:च्या पायावर उभे राहण्यास, व्यक्तीस समायोजन करण्याची कुवत प्राप्त होणे आवश्यक असते. समायोजन याचा अर्थ स्वत:शी, इतरांशी वा परिस्थितींशी जुळवून. मार्गदर्शनाच्या वरील व्याख्या सर्व प्रकारच्या मार्गदर्शन प्रक्रियेस लागू पडतात.

मार्गदर्शन-व्याप्ती

शैक्षणिक मार्गदर्शन, व्यवसाय मार्गदर्शन, व्यक्तीगत मार्गदर्शन, नैतिक मार्गदर्शन मार्गदर्शनाच्या व्याप्तीमध्ये मार्गदर्शनाचे अनेक प्रकार लक्षात घ्यावे लागतात.

शैक्षणिक मार्गदर्शनात विद्यार्थ्यांचे विविध क्षमतांचे मापन व मूल्यांकन करण्यासाठी विविध चाचण्या, कसोटया, शोधिका, निरीक्षण, संकलित नोंद पत्रक इत्यादी साधनांचा उपयोग होतो, विद्यार्थ्यांच्या क्षमता, आवड, भविष्यकालिन गरजा यानुसार योग्य अभ्यासक्रम निवडण्यासाठी विद्यार्थ्याला मदत करणे, विद्यार्थ्याला योग्य अभ्यास सवयी आत्मसात करण्यासाठी मदत करणे, अभ्यासपूरक व अभ्यासेतर कार्यक्रमात सहभागी होऊन व्यक्तिमत्त्व विकास करण्यास मदत करणे, शिक्षण, अभ्यासक्रम, शाळा, महाविद्यालय यासंबंधी योग्य अभिवृत्ती निर्माण करणे.

व्यवसाय मार्गदर्शनात विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार व्यवसाय स्वरूप, वैशिष्ट्ये, जबाबदाऱ्या इत्यादीविषयी माहिती मिळवण्यास मदत करणे, विशिष्ट व्यवसायात यश मिळवण्यासाठी विशिष्ट ज्ञान, क्षमता व कौशल्यांची आवश्यकता असते. या बाबींची माहिती मिळविण्यास मदत करणे, बौद्धिक व शारीरिक श्रमाबाबत आदर निर्माण करण्यास मदत करणे, व्यवसाय निवडताना स्वक्षमता, आवड, वृत्ती, कमतरता, बलस्थाने उणिवा याची जाणीव निर्माण करण्यास मदत करणे, व्यवसाय प्रशिक्षणासाठीच्या सवलती, शिष्यवृत्ती याची माहिती मिळविण्यास मदत करणे. विशिष्ट व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण, प्रशिक्षण कार्यक्रम, प्रवेश प्रक्रिया, प्रवेश परीक्षा शुल्क सोयी सुविधा, लागणारा पैसा व कालावधी इत्यादीविषयी माहिती पुरविते.

मार्गदर्शनाची गरज

मार्गदर्शन ही एक सर्वव्यापी संकल्पना आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक व्यक्तीला पदोपदी कमी-अधिक प्रमाणात मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. तशी ती मार्गदर्शकांना सुद्धा आहे. खालील विविध बाबींसाठी मार्गदर्शनाची गरज असते.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, अभ्यासक्रमाची व योग्य व्यवसाय निवड करण्याची गरज असते. व्यावसायिक विकासात वैज्ञानिक व तांत्रिक कौशल्ये प्राप्त करणे, नवीन आव्हानांना, समस्यांना समोरे जाणे, शिक्षण व व्यवसायाची योग्य सांगड घालून मनुष्यबळाचा प्रभावी वापरासाठी, स्वयं-रोजगारासाठी तरूणांना प्रेरित करण्यासाठी, स्थगन व गळती रोखण्यासाठी, विशेष गरजा असणाऱ्या मुलांचा शोध व त्यांना सहकार्य करण्यासाठी, विद्यार्थी उद्रेकामुळे निर्माण होणाऱ्या समस्या हाताळण्यासाठी, कुटुंबातील संस्कारांची उणीव भरून काढण्यासाठी, विकसनशील अर्थव्यवस्थेतून स्व-विकास व राष्ट्रीय विकास साधण्यासाठी, यशस्वी जीवनाद्वारे व्यक्तीच्या व समाजाच्या प्रगतीसाठी यांसारख्या गरजांच्या त्यात समावेश होतो.

मार्गदर्शनाचे फायदे

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी अचूक मार्गदर्शन महत्वाचे आहे. त्याचे फायदे पुढीलप्रमाणे

१) व्यवसाय निवडण्यास मदत करते.

२) व्यावसायिक विकास करण्यास मदत होते.
३) नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी मनाची तयारी करते.
४) नवीन आव्हाने समर्थपणे पेलण्याचे सामर्थ्य निर्माण करते.
५) मार्गदर्शन समाजातील दुर्बल घटकांची ओळख करून देते आणि त्यांना प्रेरणा देते.
६) विद्यार्थ्यांच्या गोंधळलेल्या परिस्थितीत मार्ग दाखवितात.
७) विद्यार्थ्यांच्या स्थगन आणि गळती कमी करण्यात मदत करते.
८) वेळेचा सदुपयोग करायला शिकवते.
९) समस्या सोडविण्यात किंवा एखादा प्रश्न हाताळण्यात मदत करते.
१०) समायोजन करण्यात मदत करते.

शैक्षणिक मार्गदर्शन : संकल्पना व अर्थ

शैक्षणिक मार्गदर्शन हा एक सकारात्मक उपक्रम आहे. तो एक सतत विकसित होत जाणारा कार्यक्रम आहे. प्रत्येक मूल कशाकरता योग्य आहे. कोणत्या प्रकारचे शिक्षण व योग्यता त्याला प्राप्त होऊ शकतात. आणि त्यास विकसित होण्यास ते कसे सहाय्य करू शकेल या गोष्टींना त्यात प्रमुख स्थान प्राप्त होते.

शैक्षणिक मार्गदर्शन करीत असताना व्यक्तीच्या अभिरुची व योग्यता यांचे ज्ञान हवे. शिक्षण क्षेत्रात कोणकोणत्या संधी आहेत. यासबंधीची संपूर्ण माहिती संग्रही असणे जरूरी असते. आणि त्या आधारांवर शास्त्रशुद्ध मार्गदर्शनाचा कार्यक्रम कार्यान्वित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक मार्गदर्शन म्हणजे व्यक्तीच्या औपचारीक शिक्षणाच्या प्रारंभापासून ते शिक्षण संपुष्टात येईपर्यंत व्यक्तीच्या विकासाच्या विविध व्यवस्थांप्रमाणे आणि निरनिराळया स्तरांवर तिच्या गरजा अभिरूची, अभिवृत्ती व योग्यता यानुसार सूचना माहिती, अध्यापन व प्रत्यक्ष मार्गदर्शनाद्वारे भावी जीवनाविषयी मनोभूमिका व पूर्वतयारी करवून घेणे.

विद्यार्थ्यांना पर्याप्त व योग्य मार्गदर्शन उपलब्ध झाल्याशिवाय त्यांचा योग्य विकास होणे असंभवनीय असते आणि समाजात व शाळेत उच्च मूल्यांना योग्य स्थान प्राप्त असल्याशिवाय शाळेत आदर्श परिस्थिती अस्तित्त्वात येऊ शकत नाही. तेव्हा व्यक्ती व समाज यांच्या एकंदर कल्याणाच्या दृष्टीने शाळांत व महाविद्यालयात शैक्षणिक मार्गदर्शनाची नितांत गरज आहे.

शैक्षणिक मार्गदर्शनाच्या अर्थ स्पष्ट करण्यासाठी तज्ज्ञांनी व्याख्या मांडलेल्या आहेत. काही व्याख्या पुढे देण्यात आलेल्या आहेत.

शैक्षणिक मार्गदर्शन अर्थ

- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस मिळणाऱ्या यशाशी शैक्षणिक मार्गदर्शनाची सांगड घातलेली आहे. - एल. एम. मिलर
- शैक्षणिक मार्गदर्शन म्हणजे विद्यार्थ्यांची आवडनिवड, पात्रता, समायोजन लक्षात घेवून शाळा, अभ्यासक्रम, विविध विषय व शालेय जीवनासंदर्भातील सहाय्य होय. - **जोन्स**
- शैक्षणिक मार्गदर्शन म्हणजे विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी त्याच्या शैक्षणिक जीवनात दिले गेलेले सहाय्य होय. - **ब्रेवर.**
- शाळा अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि शालेय जीवनाशी निगडित निवड व समायोजन या संदर्भात करावयाच्या मदतीशी शैक्षणिक मार्गदर्शन संबंधित असते. **ऑर्थर जे जोन्स (Arther J. Jones)**

- प्रत्येक मूल कशासाठी योग्य आहे, कोणत्या प्रकारचे शिक्षण व योग्यता त्याला प्राप्त होऊ शकतात आणि त्या विकसित होण्यास ज्या ज्या व्यक्तीचा समावेश ज्या उपक्रमात होतो ते शैक्षणिक मार्गदर्शन होय. **रुथ स्ट्रॉंग (Ruth Strong)**
- शैक्षणिक मार्गदर्शन ही एक व्यापक संकल्पना आहे. त्यात समस्त अभ्यासक्रम आणि प्रत्येक व्यक्तीच्या मूलभूत क्रियांच्या आकृतिबंधाचा सखोल विचार असतो. त्यात सामाजिक, आर्थिक, बौध्दिक, नैतिक, कलात्मक, शारीरिक, कौटुंबिक आणि आध्यात्मिक अंगाचा समावेश असतो. त्यात अध्यापन व मूल्यमापन यांचा अंतर्भाव असतो आणि त्यामुळे शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांनी व्यवहाराकडे जीवनात करावयाचे काम आणि यशस्वी जीवन जगण्याची पूर्वतयारी यासंबंधी विद्यार्थ्यांना पर्याप्त ज्ञान व मर्मदृष्टी प्राप्त करून द्यावयाची असते - **डॉ. के. जी. रामराव**
- व्यक्तीच्या औपचारिक शिक्षणाच्या प्रारंभापासून ते शिक्षण संपुष्टात येईपर्यंत त्यांच्या गरजा, अभिरुची, योग्यतेनुसार भावी जीवनाच्या दिशेने पूर्वतयारी करवून घेण्यासाठी वस्तुनिष्ठपणे केलेले साहाय्य म्हणजे शैक्षणिक मार्गदर्शन होय.

मुलांच्या वर्तनात शिक्षणाने ठरविलेल्या उद्दिष्टांनुसार अपेक्षित व विकसित असा बदल होत असेल तर मूल शिकते असे आपणास म्हणता येईल. परंतु मुलांचा शैक्षणिक विकास काही शैक्षणिक समस्यांच्या अडथळ्यामुळे होऊ शकत नाही. शैक्षणिक विकासाला कारणीभूत ज्या समस्या असतात त्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जी क्रिया केली जाते ती क्रिया म्हणजे शैक्षणिक मार्गदर्शन होय.

वरील व्याख्यांवरून मार्गदर्शन ही सतत चालणारी प्रक्रिया असून तिचा उद्देश व्यक्तीस स्वतःच्या पायावर उभे राहण्यास मदत करणे ही असतो. व्यक्तीला समायोजन करण्याची कुवत प्राप्त होणे आवश्यक असते. शैक्षणिक मार्गदर्शन म्हणजे प्रत्येक विद्यार्थी समाजाचा एक उपयुक्त घटक बनू शकेल आणि स्वतःच्या जीवनात आनंद व समाधान प्राप्त करू शकेल या दृष्टिकोनातून मार्मिकपणे निर्णय घेणे, योग्य कार्यक्रमांची निवड, शाळेतील साधनांचा उपयोग करण्यासाठी केलेले सहाय्य आणि बौद्धिकदृष्ट्या सज्ज होण्यास तिला प्रवृत्त करण्याची दीर्घकालीन प्रक्रिया होय.

शैक्षणिक मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्यास शिकण्याची साधने. शालेय जीवनातील समायोजन, शाळेतील नियमितपणा, शालेय कार्य यावाबत मार्गदर्शन केले जाते. शाळेतील उपलब्ध साधनांचा जास्तीत जास्त करणे. वाचन, लेखन, श्रवण, संभाषण, मुलाखतीत इ. कौशल्यांचे संपादन करणे. ग्रंथालय, वाचनालय, क्रीडांगण, प्रयोगशाळा, भूगोलवर्ग, संगणक, इंटरनेट यांचा लाभ घेणे. नवीन शिक्षणक्रम निवडतांना वस्तुनिष्ठ निर्णय घेणे यासंबंधीचे पर्याप्त नवा दृष्टिकोन प्राप्त करण्याचे प्रयत्न शैक्षणिक मार्गदर्शन करण्यात येतात येथे विद्यार्थ्यावर कोणतीही गोष्ट लादण्यात येत नाही.

शैक्षणिक मार्गदर्शनद्वारे विद्यार्थ्यांना शिकण्याची साधने शालेय जीवनातील समायोजन, शाळेतील नियमितपणा, शालेय कार्य यावाबत मार्गदर्शन करणे.

शैक्षणिक मार्गदर्शनाचे स्वरूप

शैक्षणिक मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक जीवनक्रमात यशस्वी होण्यासाठी साहाय्य केले जाते. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्रक्षमतांचा उच्चतम विकास साधण्यास मदत करणे यात अभिप्रेत असते. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या क्षमता, अभिक्षमता, अभिरुची, अभिवृत्ती, व्यक्तिमत्वाची गुणवैशिष्ट्ये आणि उपलब्ध असणारे विविध अभ्यासक्रम यांची सांगड घालावी लागते.

त्याचप्रमाणे अभ्यासक्रम आणि विषयांची निवड, अभ्यासाच्या पद्धती, विविध कौशल्यांचे संपादन, शालेय परिसराशी समायोजन याबाबतही विद्यार्थ्यांना मदत करता येते.

वेगवेगळ्या प्रकारच्या शाळांमधून शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या उद्दिष्टांची आणि प्रत्यक्ष कार्याची माहिती मुलांना व्हावी म्हणून मदत करणे विद्यार्थी ज्या शैक्षणिक संस्थेत दाखल होऊ इच्छितो त्या संस्थेद्वारे कोणत्या शैक्षणिक


सेवा पुरविल्या जातात याची माहिती देणे ह्या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी किती व कशाप्रकारची गुणवत्ता अपेक्षित आहे ही माहिती पुरविणे.

संस्थेकडून प्राप्त होणाऱ्या अभ्यासक्रमाशी आणि संस्थेच्या सामाजिक वातावरणाशी मुलाचे चांगले समायोजन व्हावे या दृष्टीने मदत करणे, यासाठी विषयांची निवड, प्रत्येक विषयासाठी लागणाऱ्या पुस्तकांची निवड, अभ्यासाची सवय कशी लावावी, आपल्या क्षमता वाढविणे व कमतरता दूर करणे यासंदर्भात मार्गदर्शन केले जाते. याशिवाय मुलांना संस्थेतील सामाजिक वातावरणाशी समायोजन करणे, खेळ आणि क्रीडाविषयक निवडीसाठी मार्गदर्शनाची मदत करणे, उच्च माध्यमिक अभ्यासक्रम पूर्ण होत येतो तेव्हा व्यावसायिक निवडीसाठी उपलब्ध असलेल्या अनेक मार्गासंबंधी माहिती देणे. विद्यार्थ्यांच्या काही भावनिक किंवा वर्तनविषयक त्रुटी असतील तर त्यासंबंधीही उपचारात्मक मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांना या प्रकारचे मार्गदर्शन करण्यासाठी शाळेतील सर्वच शिक्षक मार्गदर्शन करीत असतात. सर्वच शिक्षकवर्ग व मुख्याध्यापक, संस्थाप्रमुख अन्य अधिकारिवर्ग यांच्यासह मुलांच्या पालकांकडूनही सहकार्याची अपेक्षा असते. यात एकंदरीत विद्यार्थ्यांना आत्मदिग्दर्शन करता यावे. यादृष्टीने त्यांना विकासाबाबत मार्गदर्शन करणे, शैक्षणिक साहाय्य करणे, जीवनाशी त्यांचे चांगले समायोजन व्हावे म्हणून त्यांना आपल्या सुप्तशक्ती शोधून काढण्यासाठीसाहाय्य करणे, व्यवसायाची योग्य निवड करण्यासाठी मदत देणे अशी मार्गदर्शकाची मदत होत असते.

थोडक्यात बौद्धिक क्षमता, अभिरूची, अभियोग्यता, शारीरिक कार्यक्षमता इत्यादीबाबत प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या कुवतीनुसार अभ्यासक्रम कसा निवडावा. तसेच त्यासंदर्भात अभ्यास कसा करावा, कोणती संदर्भ पुस्तके वापरावीत, प्रात्यक्षिक कसे करावे, परीक्षेस कसे सामोरे जावे, शिक्षक आणि मित्रांशी कसे जुळवून घ्यावे ग्रंथालयाचा उपयोग कसा करावा, अभ्यासेतर उपक्रमात किती भाग घ्यावा कोणत्या कार्यक्रमात भाग घ्यावा. या सर्व बाबतीत विद्यार्थ्यांच्या अंगाच्या गुणांचा सर्वदृष्टीने विकास व्हावा म्हणून शैक्षणिक मार्गदर्शन केले जाते.

शैक्षणिक मार्गदर्शनाची व्याप्ती

विद्यार्थ्यांच्या विकासाचे प्रामुख्याने तीन स्तर आहेत, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक स्तर. शारीरिक विकासाबरोबर मानसिक विकासही होत असतो. शारीरिक आणि मानसिक स्थित्यंतरही तिनही स्तरांवर होत असते. प्रामुख्याने पौगंडावस्थेत तर विद्यार्थी बऱ्याचदा गोंधळलेला दिसतो. कधी एकाएकी शांत बसू लागतो. अशा वेळेस त्याचे काही प्रश्न हे सामान्य असतात. ते विद्यार्थ्यांशी चर्चा करून समजून घेतले पाहिजेत आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले पाहिजे.



पूर्व प्राथमिक स्तर : बालकांचा स्वभाव अचूक ओळखणे, स्वभावदोष दूर करणे, चांगल्या गुणांचा विकास करणे. अनौपचारिक साधनांद्वारे बालगीते, कथा, विनोदी चुटके माध्यमातून अध्यापन करणे बालकाच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन करणे, भाषा विकासाच्या दृष्टीने पाया घालणे, रंग, आकार, सौंदर्य अभिव्यक्तीला वाव देणे, कृतीला वाव देणे. या बाबी केल्या जातात.

प्राथमिक स्तर : विद्यार्थ्यांवर प्रेम करून विश्वास संपादन करणे, जिज्ञासू वृत्तीची जोपासना आणि विकास करणे. सामाजिक जाणीव वाढीस लावणे, शालेय जीवनाला प्रारंभ, समवयस्काबद्दल अभिरूची, बौद्धिक व शारीरिक विकास,

स्वतंत्र कृती करणे, पालकांपासून दूर जाण्याची वृत्ती असते व सामाजिक, नैतिक विकास केला जातो. शब्द, अनुभव, वस्तू संग्रह वृत्ती असते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी याचा उपयोग करून घेणे आवश्यक आहे. नवीन क्रिया कौशल्य शिकून शालेय जीवनाचा आनंद घेण्यास त्यांना प्रवृत्त करावे लागते.

माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तर : हा पौगंडवस्थेचा काळ असलेला वादळी अशांततेचा काळ असतो. शारीरिक, मानसिक, सामाजिक, नैतिक परिपक्वता येऊ लागते. शारीरिक बदलामुळे वर्तन व अभिवृत्तीत बदल होतो. गुंतागुंतीच्या समस्यांमुळे योग्य समायोजन झाले नाही तर गुन्हेगारी वृत्तीकडे वळतात म्हणूनयेथे शिक्षकाची भूमिका आणि मार्गदर्शन महत्त्वाचे असते. या स्तरावरील मुला-मुलींचे प्रश्न वर्ग शिक्षक, विषय शिक्षक, मुख्याध्यापकांनी योग्य प्रकारे हाताळून त्यांच्या मनातील गोंधळ दूर करावा व योग्य निर्णय घेण्यासाठी त्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

शैक्षणिक मार्गदर्शनात अध्ययन कर्त्याच्या वाढ विकासाच्या अवस्था लक्षात घेऊन शारीरिक व मानसिक विकासास पोषक मार्गदर्शन करणे अभिप्रेत आहे.

अध्ययन अध्यापन पद्धती विद्यार्थीकेंद्री व कृतीकेंद्री हवी. मूल्यमापनात सर्वंकष सातत्यपूर्ण मूल्यमापन करून प्रत्याभरणाद्वारे मार्गदर्शन अपेक्षित आहे. निरोगी शालेय वातावरणामुळे विद्यार्थ्यांच्या योग्य अभ्याससवयी, शिस्त, अभिवृत्ती, अभ्यासक्रम आकलनात प्रगती होऊन विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व चांगले विकसित होते. अशाप्रकारे शैक्षणिक मार्गदर्शन हे सर्वव्यापी दिसून येते.

- विद्यार्थ्यांमधील अभिरुची, अभिवृत्ती, अभियोग्यता, बौद्धिक क्षमता यांचे मूल्यांकन करणे. यात विविध प्रमाणित चाचण्या कसोट्या, शोधिका, निरीक्षण, संकलित नोंद पत्रिका इ. चा समावेश होतो.
- विद्यार्थ्यांच्या वरील बाबीनुसार मूल्यांकन केल्यानंतर त्यांच्यामध्ये त्या बाबतीत असलेले बलस्थान किंवा कमतरता व भविष्यकालीन गरजा यानुसार योग्य अभ्यासक्रम निवडण्यासाठी विद्यार्थ्यास मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्याला अभ्यासात, खेळात तसेच विविध स्पर्धेत समाधानकारक यश मिळविण्यासाठी आवश्यक अभ्याससवयी आत्मसात करण्यासाठी मदत करणे.
- अभ्यासेतर, अभ्यासपूरक कार्यक्रमात सहभागी होऊन स्वतः च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यास मदत करणे.
- शाळा व अभ्यासक्रमाशी समायोजन करणे.
- विशिष्ट व्यावसायिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षणास स्वतःची पात्रता किंवा क्षमता या दृष्टिकोनातून किती योग्यता आपल्यात आहे. याची जाणीव निर्माण करण्यासाठी मूल्यांकन करणे.
- शिक्षण, अभ्यासक्रम, शाळा व विद्यालय यासंबंधी योग्य अभिवृत्ती निर्माण करणे.
- विविध शैक्षणिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती मिळविणे.
- शाळा व महाविद्यालयाच्या उद्देशासंबंधी जागरूकता असणे.
- विद्यार्थ्यांच्या दृष्टीने योग्य व्यवसायात किंवा उच्च शिक्षणात प्रवेश करण्यासाठी आवश्यक असा अभ्यासक्रम निवडण्यास मदत करणे.

महाविद्यालयीन स्तर : विद्यार्थी शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करीत असतानाच ते तारुण्यातही प्रवेश करीत असतात. येथे शाळेसारखे बंदिस्त वातावरण नसते तसेच प्रत्येक बाबतीत त्याचा स्वतःला निर्णय घ्यावयाचे असतात. असे असले तरी अभ्यासक्रम कोणता निवडावा, कोणते विषय निवडावेत विद्यार्थ्यांच्या गरजा, क्षमता, अभिरुची लक्षात घेऊन त्याचा अभ्यासक्रम व विषय निवडीसाठी मार्गदर्शन आवश्यक ठरते, ग्रामीण भागातून मोठ्या शहरातील मोठ्या महाविद्यालयातील प्रवेश घेतल्यावर अशा विद्यार्थ्यांवर एक प्रकारचे दडपण येते. ते दूर करण्यासाठी त्यांना मार्गदर्शनाची गरज असते. आपण ग्रामीण भागातील किंवा मागास भागातील आहोत अशा प्रकारचा न्यूनगंड त्यांच्यामध्ये असतो तो दूर करणे आवश्यक असते.

याशिवाय याच वयात दारू, सिगारेट, ड्रग्ज अशी व्यसने लागण्याची शक्यता असते. अशावेळी त्यांना त्यापासून दूर ठेवण्याच्या दृष्टीने देखील मार्गदर्शन करणे अपेक्षित असते. या वयात भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण वाटणे स्वाभाविक असते परंतु विशिष्ट मर्यादेत राहून भिन्नलिंगी व्यक्ती सोबत मैत्री ठेवावी यासंबंधीही मार्गदर्शन करणे आवश्यक असते.

कृती

तुमच्या शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये असलेले सुप्त गुण, कौशल्ये ओळखून त्यांच्या वृद्धीसाठी कशा प्रकारे मार्गदर्शन कराल? कोणते उपक्रम राबवाल.

_____

_____

_____

_____

_____

शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज

व्यक्तीच्या योग्य सामाजिकीकरणासाठी शिक्षणाची व शैक्षणिक मार्गदर्शनाची आवश्यकता असते. सामाजिक नितीमूल्ये, शिक्षणाची ध्येये, शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्याच्या पध्दती, सामाजिक गरज, सामाजिक परंपरा यात सतत परिवर्तने होत असतात हया बदलत्या परिस्थितीला सामोरे जाताना शैक्षणिक मार्गदर्शनाची अत्यंत आवश्यकता असते.

१) **स्थगन व गळती समस्या सोडविण्यासाठी :** स्थगन व गळतीची कारणे शोधून पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.

२) **विषयाची योग्य निवड :** विद्यार्थ्यांची क्षमता, आवड, अभिवृत्ती लक्षात घेऊन त्याला योग्य अभ्यासक्रम व योग्य विषय निवडीबाबत मार्गदर्शन करणे.

३) **शाळेतील समायोजन :** मराठी माध्यमातून - इंग्रजी माध्यमात जाताना, ग्रामीण भागातून - शहरी भागात जाताना, अपंग विद्यार्थ्यांना, कर्णबधीर, मूकबधीर विद्यार्थ्यांना सामान्य शाळेत जाताना, कमी शैक्षणिक दर्जाच्या शाळेतून - उच्च शैक्षणिक दर्जाच्या शाळेत जाताना, कमी आर्थिक दर्जाच्या शाळेतून - उच्च अर्थिक दर्जाच्या शाळेत जाताना विद्यार्थ्यांना समायोजनाच्या समस्यांना सामोरे जावे लागते. अशा वेळी योग्य समायोजन साधण्यासाठी शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज असते.

४) **भविष्यकालीन शिक्षणाची माहिती मिळवण्यासाठी :** दहावी, बारावीनंतर कोणता अभ्यासक्रम निवडावा यासाठी शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज असते. स्पर्धापरीक्षा, स्वतंत्र व्यवसाय करावा? व्यावसायिक कौशल्यासाठी कोणते प्रशिक्षण घ्यावे? अशा अनेक पर्यायातून योग्य पर्याय निवडण्यासाठी शैक्षणिक मार्गदर्शन गरजेचे आहे.

५) **विविध संधीची माहिती मिळविण्यासाठी :** विविध व्यवसाय संधी व त्यासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता यांचा एक सुनियोजित कार्यक्रम राबविणे यासाठी शैक्षणिक मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.

६) **अध्ययन कृतींमध्ये विद्यार्थ्यांना गुंतवून ठेवण्यासाठी :** विद्यार्थ्यांना अध्ययन कृतीमध्ये गुंतवून ठेवल्यामुळे त्यांची संपादणूक वाढते त्यांची अध्ययनात प्रगती होऊन शालेय समायोजन साधले जाते. शैक्षणिक मार्गदर्शन हे विविध अध्यापन पद्धतींची निवड करून स्मृती, क्षमता वाढवून अध्ययन, अध्यापनात अभिरूची निर्माण करण्यासाठी गरजेचे आहे.

७) **शालेय व्यवस्थापन अध्यापन पद्धतीमधील बदलाशी समायोजन साधण्यासाठी -** ज्ञानाच्या विस्फोटामुळे शाळेच्या संघटनात, व्यवस्थापनात व अध्यापन पद्धतीमध्ये महत्त्वाचे बदल झाले आहेत. शालेय व्यवस्थापनातील

संकुचितपणा जाऊन व्यापक दृष्टीकोन आला आहे. केवळ बौद्धिक विकास अपेक्षित नसून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास अपेक्षित आहे. विद्यार्थ्यीकेंद्री अध्यापन पद्धती वापराव्यात व वैयक्तिक विकासासोबत सामाजिक समस्या सोडवाव्यात या सर्व बदलासाठी शैक्षणिक मार्गदर्शन गरजेचे आहे.

८) **समाजातील विघातक घटकांच्या वाढत्या प्रमाणाचे कारण शोधून काढणे व त्यावर उपाय शोधणे** - विषम समायोजनामुळे समाजविघातक प्रवृत्तीची वाढ होते. शैक्षणिक मानसशास्त्र त्या प्रवृत्ती शोधून त्यांचा शालेय वयातच प्रतिबंध करू शकते. अशा मुलांच्या समायोजनासाठी शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज आहे.

व्यक्तिगत दृष्टीने मार्गदर्शनाची गरज असते. त्यामध्ये विद्यार्थ्याचे जीवन सुखी व यशस्वी होण्यासाठी योग्य वेळी योग्य निर्णय घेणे आवश्यक असते. विभक्त कटुंबातील विद्यार्थ्यांना मानसिक संरक्षण, सुरक्षितता व मार्गदर्शनाची जबाबदारी शाळांवर आली आहे. विद्यार्थ्यांना स्वतःच्या बाबतीत निर्णय घेण्याची जबाबदारी आल्यामुळे मार्गदर्शनाची आवश्यकता असते. सामाजिक जीवनातील भ्रष्टाचार हिंसा, फसवणूक इ. समस्यांनी ग्रस्त केले आहे. अशावेळी युवकांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते.

प्रत्येक विद्यार्थ्यांच्या बुद्धी आवड-निवड, अभिवृत्ती शरीराची ठेवण इ. भिन्नता असते. अनुभव ग्रहणाची पद्धतीही भिन्न असते. परिणामी व्यक्तीच्या समस्याही भिन्न भिन्न असतात. अशावेळी प्रत्येकाचा स्वतंत्र अभ्यास करून मार्गदर्शन आवश्यक असते.

सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याच्या विशिष्ट समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन उपयुक्त ठरते. विषय समायोजित विद्यार्थ्यांच्या विशेष समस्या सोडविण्यासाठी शिक्षकांना मार्गदर्शन- प्रशिक्षण उपयुक्त ठरते. समायोजनासाठी, भावी आयुष्यातील व्यवसायाचे नकळत शिक्षणासाठी मार्गदर्शनाची गरज असते.

सामाजिक दृष्टीने देखील मार्गदर्शनाची गरज असते. वैयक्तिक विकासाबरोबरच सामाजिक विकासासाठी, सुजाण नागरिक निर्माण करण्यासाठी, कालानुरूप नविन व्यवसायाचे योग्य ज्ञान व कौशल्ये प्राप्त व्यक्तीच्या निर्मितीसाठी, स्थलांतरित व्यक्तीच्या पाल्यांच्या विषय समायोजन समस्या सोडविण्यासाठी विशेष मार्दर्शनाची गरज असते आणि विद्यार्थ्याला स्वतःचा शोध लावण्यास मदत करण्यासाठी महत्वाची गरज असते.

शैक्षणिक मार्गदर्शनाचे महत्त्व व फायदे

शैक्षणिक मार्गदर्शन हे शिक्षणाचे महत्त्वपूर्ण कार्य असल्याने एकंदर शिक्षणाचे ते एक अविभाज्य अंग आहे. प्रत्येक व्यक्ती समाजाची एक उपयुक्त घटक बनू शकेल यासाठी शैक्षणिक मार्गदर्शन महत्त्वाचे आहे.

१) विविध विद्यार्थी योग्यता व क्षमतांचा विचार करून आभ्यासक्रम रचना केल्यास शक्ती व वेळ वाया जात नाही मंद गतीचा प्रतिबंध होऊ शकतो.
२) अभिरूची, अभिवृत्ती व योग्यतानुसार अभ्यासक्रम निवड करता येते.
३) योग्य शिक्षणक्रम व विषय निवड शक्य होते.
४) उच्च प्राविण्य संपादनास विद्यार्थी प्रवृत्त होतात.
५) विद्यार्थ्यांना वस्तुनिष्ठपणे विचार करून निर्णय घेण्यास प्रवृत्त केले जाते.
६) विविध क्षेत्रातील अपात्र व्यक्तींची संख्या कमी होते.
७) विविध व्यवसाय संधी प्राप्त होतात.
८) विविध क्षेत्रात प्रशिक्षित तरूणांचा पुरवठा होतो.
९) शालेय समस्यांची उकल होते.
१०) विविध अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान समृध्द होते.
११) विद्यार्थ्यांचा मानसिक, शारीरिक, बौद्धिक, नैतिक विकास होण्यास मदत होते.

१२) शिक्षणक्षेत्रातील अधिकाऱ्यांना बौद्धिक व सामाजिक गरजांचे ज्ञान होते.
१३) विद्यार्थ्यांचे उपाययोजन कौशल्य व व्यावहारिक कार्यक्षमतेत वाढ होते.
१४) सर्जनशीलता व प्रतिभा यांचा विकास होतो.
१५) फुरसदीच्या वेळेचा सदुपयोग होतो.
१६) शरीर संवर्धन व समायोजन क्षमतावृद्धी होते.

अशाप्रकारे शैक्षणिक मार्गदर्शनामुळे संतुलित व्यक्तिमत्त्वाचे जबाबदार आदर्श नागरिक तयार होतील.

कृती

तुमच्या दोन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक / इतर गरजेचा शोध घ्या. त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करा व त्याच्या नोंदी ठेवा.

१.२.२ शैक्षणिक मार्गदर्शनाची ध्येये व उद्दिष्टे

शैक्षणिक मार्गदर्शनाची ध्येये

शैक्षणिक मार्गदर्शनाची ध्येये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला पोषक ठरतात. ती ध्येय पुढीलप्रमाणे-

(१) विद्यार्थ्यांमध्ये भविष्याचे ध्येय निश्चितीसाठी क्षमता विकसन

विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या भविष्याचे नियोजन, त्यांच्या बद्दल आणि ते ज्या जगात राहतात त्याबद्दलच्या सर्व घटकांचा विचार करून हुशारीने कार्य करता यावे. विद्यार्थी शैक्षणिक किंवा व्यावसायिक कोणते क्षेत्र निवडणार? आपल्याया भविष्यात नेमके काय करायचे आहे? त्यासाठी आपल्या क्षमता ओळखणे, स्वशोध घेणे, व ध्येयनिश्चितीसाठीच्या विविध क्षमतांचे विकसन करणे.

(२) विद्यार्थ्यांमधील आंतरव्यक्ती संबंध कौशल्य विकसनासाठी मार्गदर्शन

जीवनातील विविध परिस्थितीमध्ये योग्य ते समायोजन करण्यासाठी आंतरव्यक्ती संबंधकौशल्य उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांचे योग्य सामाजिक वर्तन, व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह, शालेय व इतर पर्यावरणाशी जुळवून घेण्यासाठी समायोजनाची गरज असते. हे समायोजन जितके प्रभावीपणे साधले जाईल तितकेच आंतरव्यक्ती संबंध कौशल्ये विकसित होतात व यासाठी मार्गदर्शनाची गरज असते.

(३) विद्यार्थ्यांना भविष्यातील जबाबदारीची जाणिव निर्मितीसाठी मार्गदर्शन

विद्यार्थी भविष्यात जे क्षेत्र निवडणार आहेत किंवा आवड, छंद यातून स्वविकास साधणार आहेत यासाठी त्यांची आजची व उद्याची जबाबदारी कोणती आहे याची जाणीव निर्माण होण्यासाठी अचूक मार्गदर्शन करणे.

(४) विद्यार्थ्यांमध्ये विविध मूल्यांचा शोध व महत्व जाणून घेण्याच्या प्रवृत्तीचे विकसन

सद्यस्थितीमध्ये मूल्यांचा होत असलेला ऱ्हास, आधुनिकीकरणाबाबतच्या अयोग्य संकल्पना यामुळे विद्यार्थ्यांना मूल्यांची अपुरी माहिती व त्यांचे महत्व याबाबत त्रोटकता जाणवते. जीवनातील मूल्यांचे महत्व महात्मा गांधी, रवींद्रनाथ

टागोर, स्वामी विवेकानंद यासारख्या विभूतींच्या शैक्षणिक विचारांतून स्पष्ट करता येते. म्हणून जीवनातील मूल्यांचे महत्व जाणून मूल्यशोध प्रवृत्ती विकसन गरजेचे आहे.

(५) विद्यार्थ्यांमध्ये आवडीच्या कार्यक्षेत्रात यशस्वी होण्यासाठी संशोधनवृत्तीचे विकसन

विद्यार्थ्यांमधील आवड, छंदामुळे त्यांची कारकीर्द (कार्यक्षेत्र) यशस्वी होणासाठी संशोधकवृत्ती विकसित करणे क्रमप्राप्त आहे. विद्यार्थीदशेपासूनच त्यातील सूक्ष्मता जाणून संशोधन वृत्तीने आवड, छंद अभ्यासपूर्ण विकसित करण्यासाठी संशोधन वृत्ती विकसन आवश्यक आहे.

(६) विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी भावनिक स्थिरता व तणावमुक्तीबाबत मार्गदर्शन

स्पर्धेच्या जगात टिकून राहून स्वत:चे ध्येय गाठण्यासाठी विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. हे करताना बऱ्याचदा भावनिक अस्थिरता येते, तणाव निर्माण होतो, नैराश्य येते, काही वेळा चुकीचा निर्णय घेण्याची शक्यता असते महणून मन शांत ठेवून स्वत:च्या भावनांवर नियंत्रण ठेऊन विनातणाव आहे त्या परिस्थितीतून योग्य मार्ग काढण्यासाठी मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

(७) विद्यार्थ्यांमध्ये स्त्री-पुरुष समानता व पर्यावरणाबाबत जाणीवजागृती विकसन

आज अभ्यासक्रमामध्ये लिंगभाव, लिंगभावसमानता, स्त्रीपुरुष समानता, पर्यावरण संरक्षण-संवर्धन याबाबतची माहिती दिसून येते. पण केवळ परीक्षेसाठी या संकल्पनांचा अभ्यास न करता प्रत्यक्ष कृतीमध्ये याबाबी येणे आवश्यक आहे. विद्यार्थीदशेपासूनच मुलामुलींनी एकमेकांचा आदर करणे, शालेय वातावरणात स्त्रीपुरुष समानता. वर्तन दिसून येणे, पर्यावरण संरक्षण, संवर्धनाबाबत कृतीयुक्त उपक्रम घेणे आवश्यक आहे. यातून लिंगभाव समानता व पर्यावरण जाणीवजागृतीचे विकसन करणेशक्य आहे.

शैक्षणिक मार्गदर्शनाची उद्दिष्टे

ए. जे. जोन्स यांनी शैक्षणिक मार्गदर्शनाची पुढील उद्दिष्टे सांगितली आहेत.

१. विद्यार्थ्याला पुढील शिक्षणासाठी महाविद्याल, शाळा निवडीसाठी शाळेची, महाविद्यालयाची योग्यता व प्रवेशाची शक्यता यांची माहिती देणे.
२. विद्यार्थ्याला विविध प्रकारच्या शाळेंचे, महाविद्यालयांचे हेतू व कार्ये याविषयी माहिती देणे.
३. विद्यार्थ्याला शाळेत / महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय, अभ्यासक्रम याविषयी माहिती देणे.
४. विद्यार्थ्याला शाळेतील / महाविद्यालयातील प्रवेशाचे समायोजन साधण्यासाठी सहकार्य करणे.
५. विद्यार्थ्याला शाळा / महाविद्यालये, शालेय / महाविद्यालयीन वातावरण, अभ्यासक्रम या सर्वांशी समायोजन साधण्यासाठी सहकार्य करणे.
६. विद्यार्थ्याला विविध शालेय उपक्रमामध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करणे
७. विद्यार्थ्याला स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन करणे.
८. विद्यार्थ्याला व्यवसाय निवडीसाठी मार्गदर्शन करणे.
९. विद्यार्थ्याला स्वत:ची आवड, अभिरूची, अभिवृत्ती ओळखण्यासाठी सहकार्य करणे.
१०. विद्यार्थ्याला अभ्याससवयी विकसित करण्यासाठी मदत करणे.
११. अप्रगत विद्यार्थ्यांसाठी विशेष शिक्षण देणे.

शैक्षणिक मार्गदर्शनाच्या उद्दिष्टांवरून हे लक्षात येते की, शैक्षणिक समस्या व शैक्षणिक कार्यक्रमांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती करणे व त्यांच्या क्षमतेचा व सामर्थ्यांचा पूरेपूर वापर करून घेण्यासाठी विद्यार्थ्याला सहकार्य करणे हे शैक्षणिक मार्गदर्शनाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

१.२.३ शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्त्वे

शैक्षणिक मार्गदर्शनाद्वारे विद्यार्थ्याला सहाय्य करताना विचारात घ्यावयाचे सर्वसामान्य नियम म्हणजेच शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्त्वे होय.

१) **सर्व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनाचे तत्त्व :** प्रत्येक विद्यार्थ्याला जीवनात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते म्हणून प्रत्येकास मार्गदर्शन प्राप्त करण्याचा हक्क आहे.

२) **मार्गदर्शनाच्या नियोजनाचे तत्त्व :** मार्गदर्शन ही एक हेतूपूर्णप्रक्रिया आहे. मार्गदर्शन कोण, कोणाला, का करणार ? यानुसार मार्गदर्शनाचे नियोजन करावे लागते. नियोजनपूर्ण मार्गदर्शन यशस्वी ठरते.

३) **शाळा व पालकांच्या संबंधाचे तत्त्व :** विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळा, शिक्षक, पालक, हे घटक महत्वाचे आहेत. म्हणून शाळा व पालकांचा सतत संपर्कातून शाळा पालकांचा संबंध दृढ होतो. शाळा, शिक्षक यांच्यावर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी असते.

४) **व्यक्तिभेदाचे तत्व :** एक व्यक्ती दुसऱ्यासारखी नसते. व्यक्तिभेदाचे हे तत्त्व सर्वमान्य आहे. म्हणूनच व्यक्तीभेदाचा विचार करून समस्यांसाठी उपाययोजना करणे, मागदर्शन करणे अपेक्षित आहे.

५) **प्रमाणित चाचण्यांच्या वापराचे तत्व :** मार्गदर्शन प्रक्रियेत जोपर्यंत व्यवस्थित व योग्य माहिती मिळत नाही तोपर्यंत मार्गदर्शन करता येत नाही. व्यक्तीच्या संकलित नोंदीवरून मार्गदर्शन देता येते. त्यासाठी प्रमाणित चाचण्या वापरून व्यक्तिच्या संपादणूकीची व प्रगतीची योग्य माहिती मिळते

६) **विद्यार्थ्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्व विकासाचे तत्त्व :** व्यक्तिमत्वाच्या संपूर्ण विकासासाठी व्यक्तिमत्वाच्या प्रत्येक घटकाचा विकास होणे आवश्यक आहे. म्हणून मार्गदर्शनाने व्यक्तीच्या सर्वांगीण विकासास प्राधान्य दिले पाहिजे

७) **प्रशिक्षित व्यक्तींनीच मार्गदर्शन करावे :** मार्गदर्शन हा एक विशेष विषय आहे. प्रशिक्षणाशिवाय कोणीही मार्गदर्शन करू शकत नाही. मानसशास्त्रीय कसोट्या वापरण्याचे कौशल्य, तसेच मार्गदर्शन व समुपदेशनाची तंत्रे, पद्धती यांचे ज्ञान असलेल्या प्रशिक्षित व्यक्तींनीच मार्गदर्शन करावे. अन्यथा चुकीच्या मार्गदर्शनामुळे फायदा होण्याऐवजी तोटा होण्याची शक्यता अधिक असते.

८) **मार्गदर्शकांच्या भूमिकांमधील समन्वय :** मार्गदर्शन ही एक सुटी प्रक्रिया नाही. तसेच एकट्याने करण्याची प्रक्रिया नाही. या प्रक्रियेसाठी विविध तज्ज्ञांची आवश्यकता असते व ह्या सर्व तज्ज्ञांच्या कार्यामध्ये व भूमिकांमध्ये समन्वय असणे आवश्यक असते. समन्वयाखेरिज मार्गदर्शन प्रक्रिया यशस्वी होणे अशक्य आहे. एखाद्या समन्वयकाची नेमणूक करणे देखील आवश्यक आहे

९) **मार्गदर्शनाचा लवचिक कार्यक्रम :** बदलत्या सामाजिक गरजांनुसार मार्गदर्शन मिळण्यासाठी मार्गदर्शनाचा कार्यक्रम सुद्धा लवचिक असावा व त्यात बदल करावेत.

१०) **मार्गदर्शकांच्या आचारसंहितेचे तत्त्व :** मार्गदर्शन कार्यक्रम प्रभावी होण्यासाठी व मार्गदर्शन घेणाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यासाठी मार्गदर्शकांसाठी आचारसंहिता असणे आवश्यक आहे. मार्गदर्शन घेणाऱ्यांबाबत गुप्तता महत्वाची असते. आपल्या समस्येविषयी मोकळेपणाने बोलण्यासाठी मार्गदर्शकाबद्दलचा विश्वास आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा संकोच किंवा भीती असल्यास मार्गदर्शकाला योग्य माहिती दिली जात नाही. म्हणून मार्गदर्शकांसाठी आचारसंहिता असणे आवश्यक आहे. मार्गदर्शकाकडे दिलेली माहिती ही गुप्त व सुरक्षित राहणे आवश्यक आहे.

११) **मार्गदर्शन कार्यक्रमाचे मूल्यमापन करण्याचे तत्त्व :** शाळेमधून चालणाऱ्या मार्गदर्शन कार्यक्रमाचे नियमितपणे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. घडून आलेल्या बदलांच्या स्वरुपात मार्गदर्शन कार्यक्रमाची यशास्विता दर्शविण्यात यावी. जर असे बदल घडून आले नसतील तर तो संपूर्ण कार्यक्रम अयशस्वी झाला असे समजावे.

१२) **जीवनाच्या प्रत्येक अंगाशी निगडित असण्याचे तत्त्व :** प्रत्येक व्यक्ती ही समाजातील एक घटक म्हणून विविध अंगाशी निगडित असते. शारीरिक व मानसिक आरोग्य, कुटुंब, सामाजिक गरजा, व्यावसायिक गरजा अशा विविध क्षेत्रांशी संबंधित मार्गदर्शन मिळणे आवश्यक.

१३) **किशोरावस्था, कुमारावस्था अशा विविध स्तरानुसार मार्गदर्शन :** व्यक्तीविकासामध्ये प्रत्येक टप्प्यावर विविध समस्यांना सामोरे जावे लागते. जरी प्रत्येक व्यक्ती भिन्न असली तरी बालपण, कुमारावस्था, प्रौढत्व, वृद्धावस्था या प्रत्येक अवस्थेतील काही विशिष्ट समस्या असतात. त्या स्तरातील समस्यांनुसार मार्गदर्शन मिळावे.

१४) **सातत्यपूर्ण मार्गदर्शन, अखंड प्रक्रिया :** मार्गदर्शन ही एक वृद्धापकाळापर्यंत चालणारी सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. जीवनाच्या प्रत्येक टप्प्यांवर अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. मार्गदर्शन हे जीवनाच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत आवश्यक आहे.

१५) **सामाजिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीच्या स्वरूपानुसार मार्गदर्शन करण्याचे तत्त्व :** बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीच्या व्यक्तीच्या जीवनावर फार मोठा परिणाम होतो. समायोजनाच्या समस्या निर्माण होतात. म्हणून योग्य समायोजनासाठी व चांगला नागरिक घडविण्यासाठी मार्गदर्शकाला बदलत्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, कौटुंबिक परिस्थितीचे चांगले ज्ञान असणे आवश्यक आहे.

१६) **विद्यार्थी विकासाबाबतच्या उद्दिष्टपूर्तीचे तत्त्व :** विद्यार्थी विकासासाठी शैक्षणिक, व्यावसायिक, कोणती उद्दिष्टे निश्चित केली आहेत ती पूर्ण होण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

१७) **वैविध्यपूर्ण व सर्जनशील मार्गदर्शनाचे तत्त्व :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी विविधांगी मार्गदर्शन करावे. विद्यार्थ्यांची आवड, छंद, कल्पकता लक्षात घेऊन सर्जनशील विकसनाबाबत मार्गदर्शन करावे. नवनिर्मितीच्या दृष्टीने विद्यार्थ्याला मार्गदर्शन करावे.

१८) **संतुलित मार्गदर्शनातून उर्जाप्राप्ती :** विद्यार्थ्यांना संतुलित मार्गदर्शनाची सुसंधी प्राप्त करून उर्जा प्राप्त होण्यासाठी आधार मिळावा, त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढावा.

१९) **स्वसंरक्षण करण्याचे तत्त्व :** विद्यार्थ्यांना मार्गदर्शनातून स्वसंरक्षणाचे धडे मिळावेत.

२०) **प्रत्याभरणाचे तत्त्व :** विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर त्याचे मूल्यमापन करून प्रत्याभरण करावे. त्यामुळे मार्गदर्शन कार्यक्रमाचे, मार्गदर्शकाचे, मार्गदर्शन घेणाऱ्याचे यातील कच्चे दुवे किंवा त्रुटी कळतील व सुधारणा करता येतील तसेच विद्यार्थ्यांनी प्रेरणा मिळते.

१.२.४ शैक्षणिक मार्गदर्शनाची विविध मार्गदर्शन सेवा व आवश्यक मनुष्यबळ, शालेय मार्गदर्शन समिती

क) शैक्षणिक मार्गदर्शनाची विविध मार्गदर्शन सेवा

जीवन जगत असताना प्रत्येक वेळी मार्गदर्शनाची गरज असते. लहान मुलाला कोणत्या माध्यमाच्या शाळेत प्रवेश द्यावा? आजारी पडल्यानंतर कोणत्या डॉक्टरांकडे जावे? इयत्ता दहावी/बारावी परीक्षा पास झाल्यानंतर कोणत्या विषयाची निवड करावी? अशा अनेक समस्या दैनंदिन जीवनात प्रत्येक व्यक्तीपुढे उभ्या राहतात. त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते.

शिक्षणाचा वाढता प्रसार, समान शैक्षणिक संधी उपलब्ध झाल्याने शिक्षण घेणाऱ्यांच्या संख्येत झालेली वाढ तसेच व्यवसायाची वाढती संख्या यामुळे आज शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज निर्माण झाली आहे.

१९१४ साली डॉ. केली यांनी विद्यार्थ्यांना प्रशालेतील विविध विषयांपैकी स्वत:स अनुकूल विषय निवडण्यासाठी सहाय्य केले. विविध विषय अभ्यासक्रम, शैक्षणिक संस्था, सहशालेय कार्यक्रम यातून स्वत:स योग्य अभ्यासक्रम, संस्था किंवा कार्यक्रम निवडण्यास सहाय्य करणे म्हणजे शैक्षणिक मार्गदर्शन होय.

अभ्यासक्रम, शिक्षणसंस्था किंवा सहशालेय उपक्रम यांची निवड करताना व्यवसायाशी संबंध असेलच असे नाही. परिचारिका होण्याच्या हेतूने एखाद्या विद्यार्थिनीने जीवशास्त्र निवडावे की नाही, याबाबत केलेले मार्गदर्शन शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन होय. यामध्ये व्यवसायाच्या निवडीशी संबंधित शिक्षणक्रम निवडण्याचा प्रश्न असतो.

प्रत्येक व्यक्तीचे महत्त्व लक्षात घेऊन व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी मार्गदर्शनपर उपक्रम आवश्यक आहेत. प्रत्येक प्रकारच्या शाळेने आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासंबंधीच्या गरजांची पूर्तता करण्याचे अधिकाधिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. या मार्गदर्शन कार्यक्रमांमुळे प्रत्येक विद्यार्थ्यांचा कमाल विकास होण्यासाठी सर्व शालेय घटकांनी प्रयत्नशील असावे. या दृष्टीने शालेय स्तरावर शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन सेवा पुढीलप्रमाणे उपलब्ध करून द्याव्यात.

शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाच्या विविध सेवा

१. माहिती सेवा
२. समुपदेशन सेवा
३. मार्गदर्शन सेवा
४. मानसशास्त्रीय चाचण्या सेवा
५. व्यवसाय निवड सेवा
६. व्यवसाय पूर्वतयारी सेवा
७. संशोधन सेवा
८. आत्मपरीक्षण सेवा
९. अनुधावन सेवा
१०. उपचार सेवा
११. उद्बोधन सेवा
१२. रोजगार व नोकरी सेवा

१. **माहिती सेवा :** शैक्षणिक व व्यावसायिक माहिती गोळा करून विद्यार्थ्यांना देणे. शाळेत व्यावसायिक महितीचे संकलन, वितरण करणे, व्यवसाय कोपरा, तक्ते, वृत्तपत्रे, मासिके, स्पर्धात्मक पुस्तके, रोजगार समाचार, जाहिरातीचे कात्रण, मोनोग्राप्स, विविध संस्थांची माहिती पुस्तिका ठेवण्यात यावी. सेवायोजन कार्यालय, जिल्हा उदयोग केंद्राची माहिती, तांत्रिक, वैदयकीय, वाणिज्य, कला, ललितकला, कृषी, इंजिनियरिंग या क्षेत्राची माहिती संकलित करून विद्यार्थ्यांना द्यावी. विद्यार्थ्यांच्या तोंडी, लेखी, प्रश्नांची उत्तरे द्यावीत. तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करावीत. व्यवसाय मार्गदर्शन शिबीर, परिषद, मार्गदर्शन दिन असे कार्यक्रम आयोजित करावेत. महिला आर्थिक विकास महामंडळाने चालविलेल्या व्यवसायासंदर्भातही उल्लेख व्हावा जसे, 'वूमन्स करिअर' हा वेगळा विभाग करावा. तंत्रविभाग, शालेय विभाग, प्रमाणपत्र विभाग, पदवी विभाग असे स्वतंत्र माध्यमातून वर्गीकरण केल्यास विद्यार्थी आपल्या आवडीच्या विभागात अधिक लक्ष केंद्रीत करू शकतील. व पत्रपेटीचा वापर करून त्यातील प्रश्नांचे निरसन करावे.

२. **समुपदेशन सेवा :** विद्यार्थ्याला त्याच्या शैक्षणिक, व्यावसायिक आणि वैयक्तिक समस्या सोडविण्याकरीता चर्चा करून दिलेले सहाय्य अत्यंत उपयुक्त ठरते. विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक, आरोग्य, कौटुंबिक, अभ्यासाविषयक समायोजन समस्या असतात. या समस्या सोडविण्यासाठी त्याची प्रथम मुलाखत घ्यावी लागते. त्या मुलाखतीचा लिखित किंवा अलिखित आराखडा तयार करावा लागतो. समुपदेशक व समुपदेशन घेणारा विद्यार्थी यांच्यामध्ये चर्चा होऊन सुसंवाद प्रस्थापित झाला पाहिजे व समस्यांचे विश्लेषण करून त्याच्या नोंदी ठेवल्या

पाहिजेत. या चर्चेतून यशस्वी जगण्यासाठी व परिस्थितीशी जुळवून घेऊन योग्य निर्णय घेण्यासाठी समुपदेशन उपयुक्त ठरते.

समुपदेशन सेवेत येणारी कार्ये

१. विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविणे
२. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास व कुवत वाढविणे
३. निर्णय घेण्याची पात्रता निर्माण करणे
४. योग्य मनोवृत्ती निर्माण करणे
५. विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे.

मार्गदर्शनात स्वत:चा निर्णय विद्यार्थ्यांवर न लादता समुपदेशनाने त्यांचे प्रश्न सोडवावेत.

३. **मार्गदर्शन सेवा :** शिक्षक, मुख्याध्यापक, समुपदेशक, पालक यांनी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या समस्या, अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अभ्यास कसा करावा, गणित व इंग्रजी कठीण वाटतात, अभ्यासात मन एकाग्र होत नाही, परीक्षेत पेपर लिहिताना विस्मरण होते, परीक्षेत वेळ पुरत नाही, अशा वेळी विद्यार्थ्यांना होकारात्मक दृष्टीकोनातून मार्गदर्शन केले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक अशा अनेक अडचणी असू शकतात. पालकांनीही यासाठी मदत करणे अपेक्षित आहे. म्हणून शिक्षक पालक संघ शाळेत असावा. पालक व विद्यार्थ्यांना वैयक्तिक व सामूहिक मार्गदर्शन करावे. यासाठी स्वतंत्र कक्ष असावेत म्हणजे विद्यार्थी मोकळेपणाने बोलतील.

४. **मानसशास्त्रीय चाचणी सेवा :** विद्यार्थ्यांच्या बौद्धिक अभिरूची, समायोजन क्षमता समजून घेतल्या शिवाय शैक्षणिक मार्गदर्शन करणे अयोग्य वाटते. कारण सदयस्थितीचा विचार करता विद्यार्थ्यांची आवड स्वत:ची आहे, पालकांची इच्छा आहे की बाहय उद्दिपकांमुळे निर्माण झालेली आहे हे पाहणे आवश्यक आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विविध बुद्धिगुणांक निश्चित करणाऱ्या, अभिरुचीशोधिका चाचण्या ज्यावरून विद्यार्थ्यांची आवड कोणत्या क्षेत्राकडे आहे हे कळते. उदा. वैदयकिय, इंजिनिअरिंग, कॉमर्स, कला, ललित कला यापैकी कोणत्या शाखेची आवड आहे हे समजते. व्यक्तीमत्त्वाचे मापन करणारी समायोजनशोधिका नावाची कसोटी दिली जाते. त्यावरून विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्तवाचा परिचय होतो. त्याचे कुटुंबातील वर्तन, त्याचे आरोग्य, त्याचे सामाजिक विश्व, त्याचे भावविश्व म्हणजेच त्याच्या कौटुंबिक, शारीरिक, सामाजिक, भावनिक समस्या, गुणदोष समजतात व त्यावरून त्याला योग्य मार्गदर्शन करता येते.

५. **निवड व्यवसाय सेवा :** आज आधुनिक काळात रोज किमान एक या वेगाने नवनवीन व्यवसाय क्षेत्र निर्माण होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणते व्यवसाय क्षेत्र निवडावे हा प्रश्न निर्माण होतो. विविध स्पर्धा परीक्षा, वादविवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा, गणित, इंग्रजी, चित्रकला परीक्षा पूर्वमाध्यमिक, माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा, राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, सेवा भरती पूर्व परीक्षा अशा परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थी जर जात असेल तर या विद्यार्थ्यांना आपला शैक्षणिक कालावधी पूर्ण झाल्यावर पुढील स्पर्धात्मक परीक्षेस बसताना त्याची मदत होते. या परीक्षांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना वस्तूनिष्ठ प्रश्न, उणे गुणदान पद्धती यांचाही अनुभव येतो.

विद्यार्थ्याच्या आवडीचे क्षेत्र, विषय, सवयीचा विचार केल्यास विद्यार्थी त्या-त्या क्षेत्रात मनापासून अभ्यास करतो व प्रगती करतो मग ती क्षेत्रे बौद्धिकच असतील असे नाही. त्यात कारककौशल्येही असू शकतात. त्यांचा देखील विचार व्हावा. जर या निवडीच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांस संधी मिळाली तर विद्यार्थी त्या क्षेत्रात प्रगती करून आपले ध्येय साध्य करू शकतो.

६. **व्यवसाय पूर्वतयारी सेवा :** निवडसेवेप्रमाणेच या सेवेतही कार्य करावे लागते, मात्र य सेवेत, विद्यार्थ्यास कोणत्या क्षेत्रात आवड जास्त आहे हे समजल्यावर त्या क्षेत्रात विद्यार्थ्याला विकास करण्याच्या हेतूने केलेली तयारी म्हणजेच व्यवसायपूर्व तयारी सेवा होय. काही विद्यार्थी कलेत, काही कविता करण्यात, काही लेख लिहिण्यात, काही स्पर्धेत व्याख्याने देण्यात आपले कौशल्य संपादित करतात. ह्या प्रत्येक क्षेत्रात त्यांना वाव मिळला तर ते अधिक प्रगती करू शकतात. तंत्र क्षेत्रातही अशीच स्थिती आहे. मुलांना लहानपणीच इलेक्ट्रॉनिक्सची उपकरणे जोडणे, उकलून पहाणे, पुन्हा जुळविणे यासारख्या कार्यानुभवातून त्यांची कौशल्ये विकसित करून घेतल्यास त्यांच्या भावी आयुष्यातील व्यवसाय संदर्भातून त्या व्यवसायाची पूर्वतयारी होते व ते प्रगती वेगात करू शकतात.

७. **संशोधन सेवा :** संशोधन म्हणजे मार्गदर्शन प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचे पद्धतशीर उत्तर शोधण्याचा प्रयत्न होय. मार्गदर्शन सेवेसाठी मूलभूत व कृती संशोधन आवश्यक आहे. संशोधनामुळे मार्गदर्शनाचे काम करणाऱ्या व्यक्तीमध्ये मानसशास्त्रीय जागरूकता राहाते. विद्यार्थ्यांच्या अध्ययन व अध्यापनापासून संशोधन सेवेत विचार अपेक्षित आहे. विद्यार्थी कोणत्या क्षेत्रात, विषयात कच्चा आहे? इतर विषयांच्या तुलनेत एखद्याच विषयांत तो मागे का पडतो? त्याच्या मनात त्या विषयाबद्दल पूर्वमत आहेत का? मागील वर्षी तो विषय कच्चा होता का? विषय शिक्षकांची अध्यापन पध्दती कठीण वाटते का? ही अध्यापन पद्धती आवडत नाही का? अभ्यासात मागे पडणारे, उशीरा येणारे विद्यार्थी, शालेय सुविधा, कौटुंबिक वातावरण अशा अनेक प्रश्नांवर संशोधन सेवागरजेची आहे. विद्यार्थी—पालक-शिक्षक यांच्यातील सहसंबध, उणिवांची देवाणघेवाण पर्यवेक्षित अभ्यासंक्रमाचा वापर, नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न, हस्ताक्षर सुधारण्यासाठीचा उपक्रम अशा अनेक बाबतीत संशोधन करता येते.

८. **आत्मपरीक्षण सेवा :** मुलांना आत्मपरीक्षणाची सवय शालेय स्तरापासूनच लावणे गरजेचे आहे. या सेवेद्वारे विद्यार्थ्यांना वास्तवतेचे ज्ञान होते. आणि शैक्षणिक संदर्भात हया सेवेतून आपण कोठे आहोत? आपणास किती प्रयत्न करावे लागतील याची जाणीव मुलांना होत असते.

मुलांच्या वर्तन, आचार, विचारात देखील आत्मपरीक्षण सेवेमुळे आकारबद्धता येते. विद्यार्थ्यांत वैचारिक एकाग्रता निर्माण झाल्यामुळे अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारक होते. यासाठी परिपाठात श्लोक म्हणणे, मोठयांचा आदर करणे, माझी शाळा भावना जागृत करणे, शालेय जीवनात समभाव, बंधुत्त्वाने वागणे, वाईट वर्तन करणाऱ्यास सर्वांसमोर शिक्षा करणे असे उपक्रम राबवावेत.

९. **अनुधावन सेवा :** शालेय स्तरावरून व्यवसाय मार्गदर्शनाचे जे-जे उपक्रम राबविले ते किती यशस्वी झाले हे पाहण्यासाठी शाळेमध्ये अनुधावन सेवा राबविणे महत्त्वाचे आहे. अनुधावनासाठी मार्गदर्शकाने/समुपदेशकाने पुढील बाबी ध्यानात घेणे गरजेचे आहे.

१. किती कृती योजना राबविल्या त्यापैकी किती यशस्वी झाल्या?

२. मार्गदर्शन घेणारा समाधानी आहे का?

३. विद्यार्थ्यांच्या सर्व समस्या सुटल्या का?

४. सदर योजना विद्यार्थ्यांना उपयुक्त होत्या का? त्यांच्यामध्ये काही सुधारणा करणे आवश्यक आहे का?

अशाप्रकारे अनेक प्रश्नांची उत्तरे अनुधावन सेवेतून मिळतात अनुधावनासाठी मुलाखत, प्रश्नावली, सर्व्हेचा वापर करू शकतो. अनुधावनामुळे समुपदेशकाला त्याच्या मार्गदर्शन प्रक्रियेची परिणामकारकता, उणीव समजते व त्यानुसार मार्गदर्शन सेवेच्या स्वरूपामध्ये बदल करता येतो.

१०. **उपचार सेवा :** ज्या विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक, मानसिक दोष, श्रवण्, शारीरिक कृतीदोष असतात ते उपचाराने दूर होऊ शकतात. अशांना केवळ पुस्तकी, शाब्दिक मार्गदर्शन उपयोगी पडत नाही तर त्यांना उपचार सेवा गरजेची असते. अनेक विद्यापीठात, महाविद्यालयात, विद्यार्थ्यांसाठी माफक दरात किंवा विनामूल्य सेवा उपलब्ध करून

दिल्या जातात. उपचार सेवा प्रभावी होण्यासाठी त्यासंबंधीचे तज्ज्ञ शाळा, महाविद्यालयात हवेत. यासाठी मनोशारीरिक दोष शोधून ते शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीच्या आड येणार असतील तर त्या दृष्टीने मार्गदर्शन होणे गरजेचे आहे. यासाठी शालेय जीवनात त्यांच्या चाचण्या घेऊन उणिवांची जाणीव करून द्यावी. त्यांनी निवडलेल्या व्यवसायात त्या कशाप्रकारे बाधा आणू शकतात याविषयी मार्गदर्शन केले तर विद्यार्थी योग्य व्यवसाय निवडतील. यासाठी उपचार सेवा प्राथमिक शिक्षणापासून अत्यंत गरजेची आहे.

११. **उद्बोधन सेवा :** उद्बोधनामुळे अद्यावत ज्ञान व सतर्कता प्राप्त होते. उद्बोधनामध्ये आधुनिक तंत्रज्ञान, व्याख्याने, चित्रपट, दृकश्राव्यमाध्यमे, नाटयीकरण, प्रदर्शन व प्रात्यक्षिक या मार्गाने उद्बोधन करता येते. आजच्या औदयोगिक व स्पर्धात्मक जगामध्ये उद्बोधन सेवेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

१२. **रोजगार व नोकरी सेवा :** विद्यार्थ्यांना जी माहिती, जे मार्गदर्शन करणार आहोत ते जर आपल्याजवळ संकलित असेल तरच त्यांना योग्य ते मार्गदर्शन आपण करू शकतो. रोजगार समाचार फाईल्स, नोकरी संदर्भ, प्रत्यक्ष मिळविलेली माहिती, संदर्भ पुस्तके, जाहिरात यांचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना 10 वी /12 वी नंतर नौदलात जाता येते. NCC सर्टिफिकेट धारकास सैन्यात जाता येते. खेळाडू असल्यास राष्ट्रीय खेळाडू शिष्यवृत्ती मिळते. हुशार विद्यार्थ्यांस कर्जाऊ शिष्यवृत्ती प्राप्त करता येते. दैनिक वृत्तपत्रामध्ये येणाऱ्या जाहिरातींच्या कात्रण फाईलींग विद्यार्थ्यांच्या मदतीने केले तर त्या जाहिरतीतून त्यांचा एक दृष्टीकोन तयार होतो व आपण नेमके कोणत्या क्षेत्रात जावे याचा अंदाज येतो.

ख) शैक्षणिक मार्गदर्शनासाठी आवश्यक मनुष्यबळ

पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर सर्व स्तरावर शैक्षणिक व व्यवसाय मार्गदर्शनाचे काम महत्त्वाचे आहे यासाठी तज्ज्ञ व तत्पर मनुष्यबळाची आवश्यकता आहे. ती पुढीलप्रमाणे -

शैक्षणिक मार्गदर्शनासाठी आवश्यक मनुष्यबळ

१. **मुख्याध्यापक :** विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्यात समन्वय साधून मार्गदर्शन सेवा पुरविणे.

२. **वर्गशिक्षक :** विद्यार्थ्यांचे अचूक निदान करून नोंदी ठेवणे व योग्य मार्गदर्शन सेवा देणे. प्रत्येक विद्यार्थ्याचे संकलित नोंद पत्रक ठेवणे व त्यानुसार योग्य मार्गदर्शन करणे

३. **मानसोपचार तज्ज्ञ :** विद्यार्थ्यांच्या मानसिक स्थितीचे परीक्षण व उपाय करणे.

४. **डॉक्टर :** शारीरिक तपासणी करून दृष्टिदोष, हृदय विकार, त्वचारोग इत्यादींचे निदान व उपचार सेवा देणे.

५. **व्यवसाय शिक्षक :** विविध व्यवसायांची माहिती उपलब्ध करून देणे, व्यवसायांशी संबंधित विविध वेबसाईट, लिंक बाबत मार्गदर्शन करणे. व्यवसाय प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे.

६. **शालेय समाजसेवक :** शाळा व समाज यातील दुवा बनून समाजातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय मार्गदर्शनातून विविध व्यवसाय संधी, व्यवसाय मार्गदर्शन द्यावे व समाजामध्ये कोणत्या व्यवसाय प्रशिक्षणाची गरज आहे, कोणत्या समस्या आहेत याची पाहणी करून शालेय अधिकाऱ्यांपर्यंत ही माहिती पोहोचवावी जेणेकरून शालेय मार्गदर्शक त्या समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करतील.

७. **ग्रंथपाल :** व्यवसाय प्रशिक्षण व विविध व्यवसायाची माहिती, नोकरीची उपलब्धता सांगणारे नोकरी संदर्भ, मासिके, पुस्तके यामार्फत ग्रंथपालाला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देता येते.

८. **विद्यार्थी :** प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मपरीक्षण करून स्वत:मधील दोष व चांगल्या बाबी ओळखाव्यात. स्वक्षमता ओळखून आपण कोणता व्यवसाय करू शकू याबाबत शिक्षकांशी मोकळेपणाने चर्चा करून नि:संकोचपणे मार्गदर्शन घ्यावे.

९. **पालक** : आपल्या पाल्याची बुद्धिमत्ता, कल, क्षमता याचा विचार करून शालेय मार्गदर्शकाला सहकार्य करून पाल्याला योग्य त्या मार्गदर्शनाचा लाभ करून घ्यावा. अवास्तव अपेक्षांचे ओझे पाल्यावर लादू नये. शिक्षक व पालकाने एकमेंकांना सहकार्य करून विद्यार्थी विकास साधावा.

१०. **संस्थाचालक** : शाळा, महाविद्यालय ज्या संस्थेचे आहे त्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांनी भौतिक व आर्थिक सुविधा उपलब्ध करून देऊन मार्गदर्शन केंद्र अदययावत करावे. यासाठी इमारत, पुस्तके, मानसोपचारांची सुविधा, डॉक्टरची सुविधा, पुस्तके, ग्रंथपाल, व्यवसाय शिक्षक, मुख्याध्यापकाला सहकार्य, पाणी, वीज यांची सोय, प्रशिक्षण सुविधा व या केंद्रात काम करणाऱ्या लोकांना योग्य मानधनाची सोय करावी. वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन केंद्राची पहाणी करून कौतुक व मार्गदर्यान करावे.

ग) शालेय मार्गदर्शन समिती

शाळेने व्यवसाय मार्गदर्शनाचा किमान कार्यक्रम हाती घ्यावा. अनेक उत्कृष्ट उपक्रम राबवावेत. प्रत्येक प्रकारच्या शाळेने आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासंबंधिच्या गरजांची पूर्तता करण्याचे अधिकाधिक प्रयत्न करावेत. या कार्यक्रमांमुळे प्रत्येक विद्यार्थ्याचा कमाल विकास कसा होऊ शकेल या दिशेने सर्व शालेय घटकांनी प्रयत्नशील असावे, तसेच पालकांचेही सहकार्य घ्यावे.

शालेय मार्गदर्शन समितीची उद्दिष्टे

विद्यार्थी, शिक्षक, शाळांचा विचार करता शालेय मार्गदर्शन समितीने उद्दिष्टानुरूप कार्य करणे अपेक्षित आहे म्हणजे त्या कार्याला योग्य दिशा मिळते, ती उदिष्टे पुढीलप्रमाणे.

१. शालेय विद्यार्थ्यांचा शारीरिक विकास करणे.
२. शालेय विद्यार्थ्यांच्या मानसिक व भावनिक विकास करणे.
३. शालेय विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास करणे.
४. शालेय विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक विकासाचा पाया घालणे.
५. शालेय विद्यार्थ्यांचे आंतरव्यक्ती संबंध कौशल्य विकसित करणे.
६. शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक विकास करणे.
७. शालेय विद्यार्थ्यांच्या निर्णयशक्तीचा विकास करणे.
८. शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया घालणे.
९. शालेय विद्यार्थ्यांचा शिक्षक-पालक-विद्यार्थी-समाज संबंध दृढ करणे.
१०. शासनाच्या नियमाचा आदर व अंमलबजावणी करून मार्गदर्शन केंद्र यशस्वीपणे कार्यान्वित करणे.

शालेय मार्गदर्शन समिती

१. अध्यक्ष - शाळेचे मुख्याध्यापक
२. सचिव, सदस्य - वर्गशिक्षक
३. व्यवसाय शिक्षक - सदस्य
४. शालेय समाज संपर्क शिक्षक - सदस्य
५. डॉक्टर - सदस्य
६. मानसोपचार तज्ज्ञ - सदस्य
७. विद्यार्थी
८. पालक

शालेय मार्गदर्शनसमिती मधील वर्गशिक्षक व विद्यार्थी, पालक वगळता सर्व सदस्य कायम राहतील. वर्गशिक्षक आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचे संकलित नोंदणी पत्रक तयार करून योग्य त्या नोंदी ठेवतील व ज्या विद्यार्थ्याला मार्गदर्शनाची गरज आहे तो विद्यार्थी, पालक, व वर्गशिक्षक आणि सर्व समिती सदस्य, अध्यक्ष मिळून मार्गदर्शन समितीचे कामकाज पार पाडतील गरज भासल्यास संस्थाचालक व शासनाचा सल्ला / मार्गदर्शन घेतील. अशाप्रकारे शालेय मार्गदर्शन समितीने कार्य करावे ही अपेक्षा आहे.

शैक्षणिक मार्गदर्शनसंबंधीचे विविध उपक्रम

शैक्षणिक मार्गदर्शन अंतर्गत शालेय व महाविद्यालयीन स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करता येते.

१. **व्याख्याने :** डॉक्टर / तज्ज्ञांचे आहार व आरोग्य, मानसिक ताणतणाव, लैंगिक शिक्षण या संदर्भात व्याख्यानातून मार्गदर्शन द्यावे. कुमारावस्था हा वादळी अशांततेचा काळ लक्षात घेऊन मुले, मुलींना प्रसंगी एकत्र, प्रसंगी स्वतंत्रपणे मार्गदर्शन देता येते.

२. **मुलाखत :** 'यशाची गुरूकिल्ली' अंतर्गत वेगवेगळया व्यवसायात यशस्वी ठरलेल्या व्यावसायिकांच्या मुलाखतीतून मार्गदर्शन करता येते उदा. कोल्हापूर मधील 'मोहक लस्सी' व्यवसाय करणारी महिला सीमा शहा तसेच आपल्या भागातील यशस्वी व्यावसायिकांचा समावेश करावा.

३. **व्यवसायाची त्रिसूत्री :** सचोटी, कसोटी, हातोटी हे विविध उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्यासाठी 'मार्गदर्शन सप्ताह' आयोजित करून विविध व्यावसायिकांनी ही त्रिसूत्री कशी अवलंबिली हे त्या-त्या व्यक्ती विशेष मार्गदर्शनातून स्पष्ट करता येते. उदा. धीरूभाई अंबानी, रतन टाटा, तसेच छोटे-छोटे घरगुती व्यवसायिक उदा. लोणचे, पापड, खाणावळ चालविणारे व्यावसायिक असे रोज एका व्यवसायकाची माहिती देता येते. यातून व्यावसायिक कौशल्ये, आंतरव्यक्ती संबंध कौशल्ये कशा प्रकारे विकसित होतात याचे मार्गदर्शन मिळते.

४. **शालेय मार्गदर्शन कक्ष :** सुतार, शिंपी, चांभार अशी कौटुंबिक पार्श्वभूमी असलेले व मेहंदी, कलाकुसर, विणकाम असे उपजत गुण असलेल्या विद्यार्थ्यांना एकत्र करून छोटया स्वरूपात 'शालेय मार्गदर्शन कक्ष' सुरू करावे. व या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी द्यावी. हे केंद्र आठवडयातून एक दिवस कार्यनुभव अंतर्गत शाळेच्या नियोजनानुसार कार्यान्वित ठेवावे. शैक्षणिक मार्गदर्शन समितीने हे काम पाहावे. तयार केलेल्या वस्तूंचे वार्षिक स्नेहसंम्मेलनाच्या वेळी प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करावे. आर्थिक लाभ शाळा व विद्यार्थी दोघांनाही मिळावा. पालकांचा सहभाग घ्यावा. म्हणजे पालकांना पाल्यातील कलागुण माहित होऊन त्या दृष्टीने आपल्या पाल्याला ते संधी देतील अशाप्रकारे मार्गदर्शन समितीने भरीव काम करा.

कृती

तुमच्या शाळेत 'शालेय मार्गदर्शन कक्ष' स्थापन करून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, व्यवसाय निवडीला संधी द्याल त्याचे नियोजन मांडा.

अनुष्का शर्माच्या 'सुई-धागा' चित्रपटातील छोट्या व्यवसायातून मोठा व्यवसाय कशामुळे होतो याची वर्गात चर्चा करा व विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्यावर टिप्पणी तयार करण्यास सांगा.

१.२.५ शैक्षणिक मार्गदर्शन : एक व्यवसाय

आधुनिक मानवी जीवन फार गुंतागुंतीचे होत चालले आहे. या गुंतागुंतीच्या जीवनामध्ये व्यक्तीच्या समोर अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहतात. त्या समस्यांचे स्वरूप वेगवेगळे असते. त्यामध्ये सामाजिक, कौटुंबिक, व्यावसायिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक इत्यादी प्रकारच्या समस्या निर्माण होतात. काही वेळा या समस्या गंभीर स्वरूप धारण करतात. भावनाप्रधान व्यक्ती थोड्याशा कारणांमुळे अस्वस्थ होतात. जीवनातील अनेक प्रश्न वस्तुनिष्ठपणे सोडवावे लागतात. म्हणून व्यक्तीस बुद्धियुक्तपणे समस्यांचे आकलन करून त्या सोडविण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते म्हणून 'शैक्षणिक मार्गदर्शन' एक व्यवसाय म्हणून स्वीकारताना. यासाठी ती व्यक्ती सक्षम असणे आवश्यक आहे.

शैक्षणिक मार्गदर्शन : एक व्यवसायसाठी आवश्यक पात्रता

ती व्यक्ती ...

१. पदवीधर असावी (कोणतीही शाखा)
२. मार्गदर्शन देण्यासाठी प्रशिक्षण पूर्ण हवे
३. संगणक साक्षर

व्यावसायिक कौशल्ये व गुण

१. व्यवसायावर निष्ठा ठेवून प्रामाणिकपणे काम करणे, या कामाची आवड असावी.
२. संयम असावा.
३. जिद्द, चिकाटीने, परिश्रम करणे.
४. नियोजनबद्ध कार्य करावे.
५. प्रत्येक व्यक्ती भिन्न असते त्यामुळे आंतरव्यक्तीसंबंध कौशल्य हवे. शिक्षक-पालक-मुख्याध्यापक-विद्यार्थी यांच्याशी गरजेनुरूप चर्चा करून योग्य मार्गदर्शन करणे.
६. सामाजिक बांधिलकी जोपासत वस्तुनिष्ठ मार्गदर्शन करून त्या समस्याग्रस्त व्यक्तीत सकारात्मक बदल होऊन समस्या सोडविणे.
७. सातत्यपूर्ण कार्य करणे.
८. मानसशास्त्राचा अभ्यास असावा. समस्यांचे विश्लेषण पद्धतशीरपणे करणे.
९. समस्याग्रस्त व्यक्तीचा आदर राखून त्याला स्वतःची जाणीव करून देणे. मानवतावादी विचारसरणी असावी.
१०. नोंदी अचूक करणे.
११. व्यवसायाची नैतिक मूल्ये जोपासणे.
१२. नकारात्मक विचारसरणी नसावी.
१३. व्यक्तिमत्व आकर्षक, मनमिळावू, अभिरूची संपन्न असावे.
१४. विविध समस्यांची माहिती असावी.
१५. व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, संस्था, वेबसाईट यांचे ज्ञान हवे.
१६. विविध अभ्यासक्रमांची, महाविद्यालयांची माहिती हवी.
१७. शालेय विद्यार्थ्यांची कुमारावस्था लक्षात घेऊन त्यांचे प्रश्न हळुवारपणे हाताळण्याचे कौशल्य हवे.
१८. शालेय शिक्षकच हे मार्गदर्शनाचे काम करत असेल तर दैनंदिन शालेय काम करून या कामाला अधिक वेळ देण्याची तयारी हवी
१९. शाळेने/संस्थेने स्वतंत्र शैक्षणिक मार्गदर्शक नेमला असेल तर त्याला योग्य मानधनाची सोय करावी व त्याच्या कामाची वेळ व दिवस निश्चित करावा.

२०. कालानुरूप होणारे बदल लक्षात घेऊन स्वत: सर्व मार्गदर्शनपर माहिती अदययावतपणे अभ्यासावी.

अशाप्रकारे शैक्षणिक मार्गदर्शन एक व्यवसाय म्हणून स्वीकारल्यानंतर तो निष्ठेने करावा व कौशल्याधिष्ठित अभ्यासपूर्ण ठरावा. हे काम करताना येणारी आव्हाने समर्थपणे पेलावीत व यशस्वीपणे कार्य करणे अपेक्षित आहे.

कृती

तुमच्या शाळेतील समस्याग्रस्त विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करा अभ्यासकेंद्रावर संपर्क सत्रावेळी सदर अनुभवांची वर्गात चर्चा करा.

१.३. सारांश

आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थी तसेच पालकांना शैक्षणिक व व्यवसायिक मार्गदर्शनाची नितांत गरज आहे. कोणता विषय निवडावा? कोणता कोर्स निवडावा? कुमारावस्थेतील शालेय विद्यार्थ्यांच्या लैंगिक समस्या, आरोग्य समस्या, अभ्यास सवयी, दहावीनंतरच्या शैक्षणिक व व्यावसायिक संधी अशा अनेक बाबींबाबत मार्गदर्शनाची गरज असते. विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, अभिरूची याचा विचार करून त्याच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता आहे यासाठी हा व्यवसाय म्हणून स्विकारताना मार्गदर्शकात कोणती पात्रता, कौशल्ये आत्मसात करावी लागतात. शैक्षणिक मार्गदर्शनाद्वारे शाळेतील सहशालेय कार्यक्रम, वैयक्तिक समुपदेशन, समायोजन आणि शाळेतील उपक्रमात भाग न घेणाऱ्या विद्यार्थ्यांशी समन्वायांसारखी विविध ध्येये पूर्ण केली जातात. शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्वे देखील असतात. तसेच विविध व्यवसाय निवड, मानसशास्त्रीय चाचण्या सेवा संशोधन, आत्मपरीक्षण इत्यादीसारख्या मार्गदर्शनाच्या सेवा असतात शाळांमध्ये मार्गदर्शन समिती कार्यरत असते त्याविषयी आपणास माहिती आहेच. थोडक्यात आपण या घटकात शैक्षणिक मार्गदर्शन आणि त्यांचे उपयोजन याचा अभ्यास केलेला आहे.

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

- मार्गदर्शन : Guidance
- शैक्षणिक मार्गदर्शन : Educational Guidance
- मार्गदर्शन सेवा : Guidance Services
- मनुष्यबळ : Human Resources
- मार्गदर्शन समिती : Guidance Committee
- व्यवसाय : Profession

320

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. शैक्षणिक मार्गदर्शनाची सद्यःस्थितीतील गरज स्पष्ट करा.
२. शालेय मार्गदर्शन समितीचा आराखडा व कार्ये स्पष्ट करा.
३. शैक्षणिक मार्गदर्शनाची तत्त्वे स्पष्ट करा.
४. समुपदेशनात येणारी विविध कार्य लिहा.
५. शैक्षणिक मार्गदर्शन एक व्यवसाय या विषयीची आपली मते स्पष्ट करा.
६. शैक्षणिक मार्गदर्शनाची ध्येये व उद्दिष्टे लिहा.

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) भोसले, रमा,डोणे उज्ज्वला, (२००९), *शिक्षणातील बदलते विचार प्रवाह*, कोल्हापूर : फडके प्रकाशन पृ ५२१,५२२,५२७-५३

२) दुनाखे, अरविंद (१९९४), *शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आणि समुपदेशन* , पुणे : नूतन प्रकाशन पृ २४,२९,६९

३) गुळवणी, मेघा (२००९), *मार्गदर्शन व समुपदेशन*, पुणे : नित्यनूतन प्रकाशन पृ २३,७३.-७४,७६-७९,८१,87

४) सरवदे, शशी (२००८), *शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुदेशन*, पुणे : डायमंड पब्लिकेशन पृ १,१५,34,८९,९०

५) सुतार, बी.पी (२००३), *व्यवसाय मार्गदर्शन*, कोल्हापूर : जयश्री सुतार प्रकाशक पृ ३३ ते ३६, ३९, ५७-६३, ९०-९२

६) http://www.scribd.com/document/315225o25/Aims-of-Educational-Guidance Retrieved on 10 Aug 2018.

७) http://www.Okaloosaschools.com/bobsikes/sites/okaloosaschools.com.bobsikes/files/files/OCSD%20pGuidance%20Manual.pdfRetirivedonS11Aug 2018.

TRUE COPY

Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

CERTIFICATE OF PUBLICATION

This is to certify that the chapter entitled

योग आणि ध्यानधारणा : काळाची गरज

Authored by

DR. PRATIBHA SADASHIV DESAI

Associate Prof. (I/C Principal),
Acharya Jawadekar College of Education, Gargoti,
Dist. Kolhapur, MS (India)

Has been Published In ISBN - 978-93-100-0564-6 Edited Book Entitled

"THE WISDOM OF BHARAT: AN EXPLORATION OF THE INDIAN KNOWLEDGE SYSTEM"

on 15/09/2023

TRUE COPY

Principal
Acharya Jawadekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

Publisher:
DR. EKNATH MUNDHE

321

322

THE WISDOM OF BHARAT: AN EXPLORATION OF THE INDIAN KNOWLEDGE SYSTEM



ISBN: 978-93-100-0564-6

EDITOR

DR. EKNATH MUNDHE

THE WISDOM OF BHARAT: AN EXPLORATION OF THE INDIAN KNOWLEDGE SYSTEM

ISBN: 978-93-100-0564-6

EDITOR©

DR. EKNATH MUNDHE
Professor,
Rayat Shikshan Sanstha's,
S. M. Joshi College Hadapsar, Pune-411028

Publisher : Dr. Eknath Mundhe
S. M. Joshi College, Hadapsar, Pune-28
Maharashtra, India

Edition : 1st

Date : 15th September, 2023

Price : Rs. 100

All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the copyright holder.

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur

40. *IMPORTANCE OF YOG AND MEDITATION FOR HEALTH-RELATED PHYSICAL FITNESS* 211-212
Dr. Sheetal Laxman Shendkar

41. *ARCHITECTURAL GRANDEUR - EXPLORING THE DIVERSE STYLES OF TEMPLE ARCHITECTURES IN INDIA* 213-222
Vini Vinoj Kurup, Dr. Noel Parge

42. *WISDOM FROM INDIAN ETHOS FOR CONTEMPORARY BUSINESS AND MANAGEMENT.* 223-231
Tarun Sadanand Kuckian

43. *HERBAL REMEDIES AND HEALING PRACTICES: INVESTIGATING TRADITIONAL MEDICAL PLANT AND THEIR THERAPEUTIC APPLICATIONS* 232-238
R. G. Dandage, A. T. Hatekar, Dr. N. S Gaikwad, Dr. R. K. Jadhav

44. *AYURVEDA AND TRADITIONAL MEDICINES* 239-241
Akshata Hatekar, Rewati Dandage, Dr. N. S Gaikwad, Dr. R. K. Jadhav

45. *DEVELOPMENT OF AYURVEDA - TREND TO MODERN* 242-247
Mr. Swapnil Somnath Basate

46. ग्रंथालय व्यवस्थापनातील आधुनिक तंत्र : आऊटसौर्सिंग व ज्ञानव्यवस्थापन 248-252
श्री.धनंजय दत्तात्रय गुरव

47. तत्त्वज्ञान आणि तत्वमीमांसा: अद्वैत, वेदांत, न्याय,वैशेषिक आणि इतर विचारसरणीच्या तात्विक प्रणालींचे विश्लेषण 253-256
डॉ.खोपडे स्मिता जयेंद्र

48. आत्मनिर्भर भारत स्वदेशी ते स्वयंरोजगारा पर्यंत टाकलेले एक पाऊल. 257-262
श्री.प्रताप जयवंतराव देवरे

49. योग आणि ध्यानधारणा : काळाची गरज 263-269
Dr. Pratibha Sadashiv Desai

TRUE COPY

Principal
Acharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416209

ISBN: 978-93-100-0564-6

योग आणि ध्यानधारणा : काळाची गरज

Dr. Pratibha Sadashiv Desai
Associate Prof. (I/C Principal),
Acharya Jawadekar College of Education, Gargoti, Dist. Kolhapur, MS (India)

सारांश: योग आणि ध्यान याविषयी लोकांच्या मनात गोंधळ दिसून येतो. योग आणि ध्यान यात मोठा फरक असताना ते दोन्ही एकच आहेत असे अनेकांना वाटते. त्यांचे फायदे आणि काम करण्याच्या पद्धती भिन्न आहेत. म्हणूनच प्रस्तुत पेपरचा हेतू हा आहे की, योग व ध्यानधारणा यांच्या संकल्पना माहित करून घेणे व त्यातील फरक लक्षात घेऊन योग व ध्यानधारणेचे विविध क्षेत्रामध्ये असलेले योग, ध्यानाचे महत्व माहिती व्हावे. त्याचा शैक्षणिक, व्यावसायिक, औद्योगिक, राजकीय, सामाजिक, वैयक्तिक जीवनात कशा प्रकारे वापर करावा व स्वत:चे जीवन निरोगी, आनंदी सुखमय करावे.

Keywords- *योग, ध्यानधारणा.*

प्रस्तावना -

ध्यान हा योगाचाच एक भाग आहे. योग आणि ध्यान यातील सर्वात मोठा फरक म्हणजे शरीराची हालचाल. योगांसन करताना वेगवेगळ्या असनांमुळे शरीरात हालचाल होते. तर ध्यानात असे होत नाही. ध्यान केल्याने, मानव त्यांच्या उर्जेद्वारे एखाद्या विशिष्ट गोष्टीवर, आवाजावर किंवा श्वासावर लक्ष केंद्रित करतो.

योगासने केल्यानंतर ध्यानधारणा करण्याचा सल्ला नेहमीच दिला जातो. योगासनानंतर शरीरात एक प्रकारचा कंप निर्माण होते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. शरीराला सामान्य स्थितीत आणण्यासाठी ध्यान करण्याचा सल्ला दिला जातो. अशा प्रकारे ध्यान ही योगानंतरची साधना असते.

ध्यान सोप्या भाषेत समजावून घ्यावयाचे तर माणसाचे मन एका वेळी अनेक गोष्टींचा विचार करते. त्यामुळे त्याच्या मनाची शांती भंग पावते. ती शांतता परत मिळविण्यासाठी ध्यान करण्याचा सल्ला दिला जातो. सकाळी 4-5 किंवा 6-7 वाजेपर्यंत ध्यानधारणा करण्यासाठी सर्वोतम वेळ मानली जाते.

ध्यानामुळे अनेक प्रकारे आराम मिळतो, जसे की ते विसरण्याची सवय सुधारते, तणाव आणि अस्वस्थता कमी होते आणि झोप न लागण्याच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात होते. अशा प्रकारे प्रस्तुत पेपर मध्ये योग व ध्यानधारणाबाबत अभ्यास केला आहे. ज्याचा प्रत्येकाला विविध क्षेत्रामध्ये व स्वजीवनातही मोठा फायदा होतो.

संशोधन पेपरची उद्दिष्टे -

1. योग व ध्यानधारणा या संकल्पनांचा अभ्यास करणे.
2) योग व ध्यानधारणा यातील फरकाचा अभ्यास करणे.
3) योग व ध्यानधारणेच्या फायद्याचा अभ्यास करणे.

ISBN: 978-93-100-0564-6

TRUE COPY
Principal
Aacharya Javdekar College of Education
Gargoti, Dist. Kolhapur 416

विषयविवेचन -

योग संकल्पना -

योग-व्याख्या -

गुरूदेव श्री श्री रविशंकर म्हणतात, "योगे म्हणजे निव्वळ व्यायाम आणि आसन नव्हे. हा भावनात्मक समतोल आणि त्या अनादी अनंत तत्वाला स्पर्श करत अध्यात्मिक प्रगतीतील सर्व शक्यतांची ओळख करून देणारे शास्त्र आहे." महर्षी पतंजली यांनी इसवी सन 200 ते 500 दरम्यान योगसूत्रे लिहिली आहेत. यातून त्यांनी योग जीवनाची मूलभूत सूत्रे सांगितली आहेत. त्यामुळेच त्यांना योगाचे 'पितामह' म्हणून ओळखले जाते.

योग-अर्थ-

योग हा शब्द संस्कृत भाषेतील 'युज' या शब्दापासून बनला आहे. ज्याचा अर्थ आहे ईश्वराशी आत्म्याचे मिलन, म्हणजेच योगामध्ये इतकी शक्ती आहे की, ती तुम्हाला अमरत्व प्राप्त करू शकते.

योग शिक्षण -

योगविद्या ही भारतीय ऋषीमुनींनी आपल्यातील चेतनशक्तीचा विकास करण्यासाठी प्रत्यक्ष अनुभवलेली साधना आहे. ही विद्या पुरातन काळापासून गूढ अशी व्यक्तिगत साधना होती. गुरूकुल शिक्षण पद्धतीपासून 'योग' शिक्षणास प्रारंभ झाला असून, ऋषींनी आपल्या शिष्यांना योगविद्या शिकविण्यास सुरूवात केली. उदा. शरीर व मन यांना एकत्र जोडणे.

अलीकडच्या धकाधकीच्या जीवनात योग शिक्षणाची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. योग शिक्षकांची अपुरी संख्या व वाढत्या लोकसंख्येमुळे व्यक्तिगत योग शिक्षण देणे आवश्यक होऊ लागले आहे. त्यामुळे सामान्य शाळा, महाविद्यालयातील शिक्षणाप्रमाणेच सामुदायिक योग शिक्षणाची पद्धत रूढ झाली आहे. आज जगभर योगशिक्षण देणाऱ्या संस्था, विद्यापीठे, योगशिक्षक, योगपंडित, प्राध्यापक, सामूहिक योग शिबिरे इत्यादींच्या माध्यमातून योगशिक्षण दिले जात आहे. 21 जून हा 'जागतिक योग दिन' म्हणून सर्वत्र साजरा केला जातो.

योगाचे प्रकार -

योगाच्या आठ लोकप्रिय शैली आहेत. 1) अष्टांग योग 2) हठयोग 3) हॉट योग 4) अय्यंगार योग 5) कुंडलिनी योग 6) पॉवर योग 7) रिस्टोरेटिव्ह योग 8) विन्यास योग

योग हा एक समग्र सराव आहे जो मन, शरीर आणि आत्मा यांच्यात संतुलन निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करते. जरी बरेच लोक योगास शरीरिक आसन किंवा आसनाशी जोडतात, प्रत्यक्षात ही एक आध्यात्मिक साधना आहे. जी हजारो वर्षापासून चालत आलेली आहे. योगाचे तत्वज्ञान हिंदू परंपरेत रूजलेले आहे. व्यक्तीमध्ये विवेक, जागरूकता, आत्मनियमन आणि उच्चचेतना विकसित करणे हे योगाचे उद्दिष्ट आहे.

ध्यानधारणा संकल्पना -

जे तुम्हाला गाढ विश्रांती देते ते आहे ध्यान. अशी प्रक्रिया आहे. ज्यामध्ये साधक [illegible] आणि मनाला हरवतो. आर्ट ऑफ लिव्हिंगमधील ध्यान अशी साधी सोपी क्रिया आहे जे

ISBN: 978-93-100-0564-6

कोणीही करू शकतात. 'ध्यान म्हणजे एकागता नव्हे तर ध्यान एकाग्रतेच्या विरुद्ध आहे.' असे आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकरजी म्हणतात. गाढ झोपेपेक्षा गहरी विश्रांती ध्यानामुळे मिळते. जेव्हा मन चंचलतेपासून मुक्त होऊन शांत, स्थिर होते तेव्हा ध्यान लागते.

सहज समाधी ध्यान -

सहज समाधी ध्यान हे मंत्रावर आधारित ध्यान आहे. जेथे एक मंत्र ठराविक पद्धतीने उच्चारल्यास, गहन विश्रांती मिळते आणि आपल्याला जागरूक ठेवते. हे ध्यान आपले जागृत मन विनासायास स्थिर करते आणि जेव्हा मन पूर्णपणे स्थिर होते तेव्हा ते सर्व ताणतणावापासून मुक्त होऊन वर्तमानात येते.

ध्यानासाठी सूचना -

1) सोयीची व ठराविक वेळ आणि हवेशीर जागा नक्की करणे.
2) सैलसर सुती कापडे वापरणे.
3) ध्यान करण्यापूर्वी पोट हलके ठेवणे.
4) हलका-फुलका व्यायाम व दीर्घ श्वासांनी ध्यानाची सुरुवात करणे.
5) ध्यान करतेवेळी चेहऱ्यावर सुंदर स्मित हास्य नक्की असू द्यावे.

'ध्यान' अर्थ -

'ध्यान' म्हणजे एकरूप होणे. त्यासाठी आपण श्वासापासून सुरुवात करतो. 'ध्यान' जो एकाग्रतेचा सराव आहे. स्वत:ला पुन्हा पुन्हा त्याक्षणी परत आणतो. सकारात्मक किंवा नकारात्मक असो, तणावाचे निराकरण करते. ध्यानामुळे चिंता, तीव्र वेदना, नैराश्य, हृदयविकार आणि उच्च रक्तदाब यासारख्या समस्याही कमी होऊ शकतात.

ध्यान काय काम करते? -

